
सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २८८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २० डिसेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६





## खळबळजनक दावा! एपस्टीन फाईल्समध्ये Modi On Board उल्लेख

### एका केंद्रीय मंत्र्याचेही नाव समोर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०कराड**

अमेरिकेतील बहुचर्चित एपस्टीन फाईल्सबाबत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी पुन्हा एकदा खळबळजनक दावा केला आहे. १९ डिसेंबरला अमेरिकन काँग्रेसने एपस्टीन फाईल्समधील अंशत: माहिती सार्वजनिक केली आहे. जवळपास ३० हजार फोटो, ईमेल आणि अन्य डेटा यात असल्याने ही संपूर्ण फाईल सार्वजनिक करण्यासाठी आणखी काही आठवडे लागतील असं तिथल्या अटॉर्नी जनरल यांनी सांगितले आहे. १९ तारखेला फाईलमधील काही माहिती समोर आली. त्यात केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांचा उल्लेख आढळला आहे. त्याशिवाय मोदी ऑन बोर्ड असा एपस्टीनने पाठवलेल्या ईमेलमध्ये लिहिले आहे त्यामुळे त्याबाबत सरकारने खुलासा केला पाहिजे अशी मागणी पृथ्वीराज चव्हाण यांनी केली.




कराड येथील पत्रकार परिषदेत पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, एपस्टीन फाईलमध्ये अनेक फोटो आहेत. त्यात स्वत: डोनाल्ड ट्रम्प यांचे फोटो असल्याने ते दडपण्याचा प्रयत्न सुरू आहे. ज्या खासदाराने एपस्टीन फाईल्सबाबत विधेयक मांडले होते, ते मूळ भारतीय वंशाचे आहेत. त्यांनी एका मुलाखतीत आम्ही जारी केलेले पुरावे पाहत आहोत पण आमचे समाधान होत नाही असं म्हटलं आहे. अमेरिकन सरकारकडून काही माहिती लपवण्याचा प्रयत्न होत आहे. जी माहिती समोर आली आहे त्यातील ईमेलमध्ये काही उल्लेख भारतीयांचा आहे. केंद्रीय मंत्री हरदीप पुरी यांचं नाव एका ईमेलमध्ये आहे असं त्यांनी सांगितले.

त्याशिवाय ट्रम्प यांच्या प्रशासनातील एक मोठा अधिकारी ज्याला भारताच्या पंतप्रधानांना भेटायचे होते. त्याने एपस्टीनला ईमेल केला होता. त्यानंतर काही दिवसांनी मोदी ऑन बोर्ड असं उत्तर एपस्टीनकडून त्याला मिळाले होते. याचा अर्थ मोदी भेटायला तयार आहेत. आता मोदी आणि एपस्टीन यांचं काय नाते आहे? जो मोदींची भेट कुणालाही देऊ शकतो याचे उत्तर सरकारला द्यावे लागेल. त्यासोबत एक माजी खासदार आणि मोठे उद्योगपती अनिल अंबानी यांचेही नाव आहे. अमेरिकेत राहणारे भारतीय वंशाचे आरोग्य क्षेत्रातील मोठे व्यक्ती आहेत त्यांच्याही नावाचा उल्लेख आहे. अजूनही या फाईल्समध्ये काय काय माहिती आहे याचा शोध घेतला जात आहे. ही माहिती सार्वजनिक असल्याने कुणालाही सहज उपलब्ध होईल असं पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, अमेरिकेन संसदेकडून एपस्टीन फाईल्सबाबत स्वतंत्र वेबसाईट बनवली आहे. त्यात सगळी माहिती वाचता येईल. आतापर्यंत खटल्यात काय काय समोर आले ती प्रचंड सामुग्री डिजिटल स्वरुपात उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याचे विश्लेषण करायला काही काळ लागेल. मला जी माहिती अमेरिकन माध्यमातून मिळाली त्यातून भारताच्या राजकारणात एपस्टीन फाईलचे परिणाम होतील असं मला वाटत होते. मी कुणाचेही नाव याआधी घेतले नव्हते. भारताच्या राजकारणात आमुलाग्र बदल होईल असं विधान मी केले होते. त्याची खूप चर्चा झाली. देशभर ते विधान गाजले. बाल लैंगिक शोषणाचे हे प्रकरण फार गंभीर आहे. अमेरिकेत यावर संघर्ष सुरू आहे. एपस्टीन फाईलबाबत माहिती समोर यायला आणखी काही आठवडे लागतील असंही पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले.

## 'वंदे मातरम्' हा राष्ट्र निर्माणाचा मंत्र बनवायचा आहे

### प. बंगालमधून पंतप्रधान मोदींचे देशाला आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०कोलकाता**

पंतप्रधान नरेंद्र मोदीपश्चिम बंगाल दौऱ्यावर आहेत. आताच्या घडीला केंद्रीय निवडणूक आयोगाकडून सुरू असलेल्या डखठ प्रक्रियेला पश्चिम बंगालमधून मोठा विरोध होताना पाहायला मिळत आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी या प्रक्रियेला विरोध दर्शवला आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा दौरा महत्त्वाचा मानला जात आहे. ज्या ठिकाणी डखठ विरोधात ममता बॅनर्जी यांनी रॅली केली. त्याच भागात पंतप्रधान मोदी सभा घेणार असल्याचे म्हटले जात आहे. तत्पूर्वी, खराब हवामानामुळे पंतप्रधान मोदी यांचे हेलिकॉप्टर नियोजित सभास्थळी उतरू शकले नाही. त्यामुळे पंतप्रधान मोदी यांनी व्हर्च्युअल पद्धतीने सभेला संबोधित केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी पश्चिम बंगालमधील नादिया येथील ताहेरपूर येथे एका रॅलीसाठी पोहोचले. परंतु कमी दृश्यमानतेमुळे त्यांचे हेलिकॉप्टर उतरू शकले



नाही. त्यानंतर पंतप्रधान मोदी कोलकाता विमानतळावर परतले. पंतप्रधान मोदी यांनी कोलकाता विमानतळावरून रॅलीला व्हर्च्युअल पद्धतीने संबोधित केले. खराब हवामानामुळे रॅलीच्या ठिकाणी पोहोचू न शकल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी जनतेची माफी मागितली.

पंतप्रधान मोदी यांनी आपल्या भाषणात महान साहित्यिक बंकिमचंद्र चॅटर्जी यांना आदरांजली वाहिली आणि म्हटले की, वंदे मातरम् हा ब्रिटिश राजवटीविरुद्धच्या संघर्षाचा मंत्र होता. तोच वंदे मातरम् हा मंत्र आता राष्ट्र निर्माणाचा मंत्र बनवायचा आहे, असे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केले. रॅलीला उपस्थित राहण्यासाठी निघालेल्या काही भाजपा कार्यकर्त्यांच्या रेल्वे अपघातात मृत्युमुखी पडल्याच्या वृत्ताबद्दल पंतप्रधानांनी तीव्र दुःख व्यक्त केले आणि कुटुंबांचे सांत्वन केले. या दुःखाच्या वेळी केंद्र सरकार पीडित कुटुंबांसोबत असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले.

दरम्यान, केंद्र सरकार देशातील नागरिकांच्या सोबत आहे. जीएसटीमुळे पश्चिम बंगाल आणि संपूर्ण देशातील लोकांना मोठा दिलासा मिळाला आहे . दुर्गा पूजा आणि इतर सणांमध्ये देशभरातील लोकांना त्याचा मोठा फायदा झाला आहे. गंगा बिहारमधून बंगालमध्ये वाहते. बिहारने बंगालला मार्ग दाखवला आहे. बंगाल जंगलराजापासून मुक्त झाला पाहिजे. सर्व वयोगटातील लोकांची तीच मागणी आहे. पश्चिम बंगालच्या लोकांसाठी मनापासून समर्पित आहेत. राज्यासाठी निधी आणि धोरणांची कोणतीही कमतरता भासणार नाही, अशी गॅरंटी पंतप्रधान मोदी यांनी दिली.

## मुंबई निवडणुकीपूर्वी महायुतीत ट्विस्ट

### भाजपा-राष्ट्रवादी नेत्यांची बैठक, शिंदेसेनेला डच्चू?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० मुंबई**

येत्या मुंबई महापालिका निवडणुकीसाठी महायुतीत शिंदेसेना आणि भाजपा यांच्यात रस्सीखेच सुरू आहे. या दोन्ही पक्षांमध्ये आतापर्यंत २ संयुक्त बैठका पार पडल्यात. या बैठकांमध्ये अजित पवारांची राष्ट्रवादी कुठेही नव्हती. नवाब मलिकांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीसोबत युती करणार नाही अशी भूमिका भाजपाने घेतली होती. परंतु शिंदेसेनेसोबत जागावाटपाचा तिढा सुटत नसताना दुसरीकडे राष्ट्रवादी आणि भाजपा नेत्यांमध्ये वरिष्ठ पातळीवर बैठक होणार असल्याचं समोर आले आहे. शुक्रवारी रात्री राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यात मुंबई महापालिकेतील निवडणुकीवर चर्चा झाली.

मुख्यमंत्र्यांच्या या भेटीनंतर सुनील तटकरे आणि भाजपाचे मुंबई निवडणूक प्रभारी मंत्री आशिष शेलार यांच्यातही बैठक झाली. या दोघांमध्ये २०-२५ मिनिटे चर्चा करण्यात आली. महायुती म्हणून महापालिका निवडणुकीला सामोरे गेले पाहिजे अशी तटकरेंनी भूमिका मांडली. गेल्याच आठवड्यात



पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेत बीएमसीसह इतर महापालिकांमध्ये महायुतीने लढले पाहिजे, त्यात राष्ट्रवादीचा सहभाग असावा अशी चर्चा केली होती अशीही माहिती तटकरेंनी दिली.

मुंबई महापालिका निवडणुकीसह इतर महापालिकांमधील महायुतीच्या चर्चेसाठी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे वरिष्ठ पातळीवर चर्चा करत आहेत. त्यात राष्ट्रवादीने मुंबईत ५० जागांचा प्रस्ताव भाजपासमोर ठेवल्याची माहिती सूत्रांकडून समोर येत आहे. आशिष शेलार हे मुंबई भाजपाचे निवडणूक प्रभारी आहे. त्यांच्यासोबत सुनील तटकरे यांची जागावाटपावर चर्चा होत आहे. त्यामुळे नवाब मलिकांचा मुद्दा मागे पडून महायुतीत ट्विस्ट आल्याचे चित्र दिसून येत आहे.२०१७ च्या निवडणुकीत भाजपाने जिंकलेल्या सर्व ८२ जागांवर भाजपाने दावा केला असून शिवसेनेने मिळविलेल्या ८४ जागा देण्यास भाजपाने स्पष्ट नकार दिल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले. भाजपाने पहिल्या बैठकीत शिंदेसेनेला केवळ ५२ जागांची ऑफर दिली होती. मात्र शिंदेसेनेने गेल्या निवडणुकीतील ८४ जागा आणि अतिरिक्त जागांसह एकूण १२५ जागांची मागणी केली. एकूण १५७ जागांचा निर्णय झाला. अद्याप सुमारे ७० जागांवर तिढा कायम आहे. त्यातच भाजपा आणि राष्ट्रवादीच्या स्वतंत्र बैठकीमुळे शिंदेसेनेला महायुतीत डच्चू मिळणार का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.




## आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ च्या स्पर्धेसाठी शुभमन गिलच नव्हे, जितेश शर्मालाही वगळलं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० मुंबई**

आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ च्या स्पर्धेसाठी आज (२० डिसेंबर) टीम इंडियाची घोषणा करण्यात आली.बीसीसीआयने पत्रकार परिषद घेऊन सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. टी-२० विश्वचषक २०२६ साठी संघ टीम इंडियाचा संघ निवडताना बीसीसीआयने ५ धडाकेबाज निर्णय घेतले.

शुभमन गिलला टी-२० संघातून वगळण्यात आले आहे तर अष्टपैलू खेळाडू अक्षर पटेलची उपकर्णधारपदी निवड करण्यात आली आहे.

संजू सॅमसन आणि इशान किशन यांची विश्वचषक संघात यष्टीरक्षक-फलंदाज म्हणून निवड करण्यात आली आहे. संजूचा समावेश अपेक्षित होता, परंतु इशान किशनचा समावेश आश्चर्यकारक होता.

इशान किशनने नोव्हेंबर २०२३ मध्ये शेवटचा टी-२० सामना खेळला होता. परंतु त्याने नुकत्याच संपलेल्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये ऐतिहासिक कामगिरी केली. तसेच सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीच्या अंतिम फेरीत शतक ठोकणारा इशान हा पहिला कर्णधारही ठरला.गेल्या अनेक महिन्यांपासून टी-२० संघातून बाहेर असलेल्या रिंकू सिंगला टी-२० विश्वचषकाच्या संघात स्थान देण्यात आले.तर जितेश शर्माला टी-२० विश्वचषकाच्या संघातून वगळण्यात आले आहे.

## 'मविआ'ला तडा! काँग्रेस पक्ष मुंबई महानगरपालिका स्वबळावर लढवणार

### काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी केली घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०मुंबई**

आगामी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. ठाकरे बंधूंची युती झाल्यानंतर मविआचे भविष्य काय? असा प्रश्न उपस्थित झाला होता. जागावाटपाचा फॉर्म्युला कसा असेल? याचीही चर्चा झाली. तसेच मनसेच्या उत्तर भारतीयांच्या भूमिकेबाबत काँग्रेसला आक्षेप होता. अखेर काँग्रेसने ही निवडणूक स्वबळावर लढविण्याची घोषणा केली आहे.

काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. मुंबई महानगरपालिकेतील सर्व २२७ जागांवर लढण्याची तयारी काँग्रेसने केली असल्याचे ते म्हणाले.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई काँग्रेस संसदीय कार्य समितीची महत्त्वपूर्ण बैठक




आज मुंबईत संपन्न झाली. मुंबई काँग्रेस अध्यक्ष व खासदार वर्षा गायकवाड, महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नीथला, मुंबई प्रभारी यूबी व्यंकटेश यांची प्रमुख उपस्थिती या बैठकीला होती. बैठकीनंतर एएनआय वृत्तवाहिनीशी बोलताना चेन्नीथला म्हणाले की, आम्ही स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे.

पत्रकार परिषदेत प्रभारी रमेश चेन्नीथला म्हणाले, मुंबईतल्या विविध प्रश्नांवरून आमच्या नेत्यांनी आंदोलने केली आहेत. प्रदूषण, भ्रष्टाचार, रुग्णालयाची दुरावस्था हे प्रश्न आम्ही हाती घेतले होते. मागच्या काळात महानगरपालिकेत काय झाले, याची जनतेला कल्पना आहे. मुंबई महानगरपालिकेची चार वर्षांपासून निवडणूक झालेली नाही. प्रशासनाच्या जोरावर राज्य सरकार महापालिका चालू पाहत होते. सर्वोच्च न्यायालयाने दट्ट्यामुळे ही निवडणूक होत आहे. आम्ही ही निवडणूक भाजपाच्या विरोधात, उबाठाच्या विरोधात लढत आहोत. धर्मनिरपेक्ष पक्षांनी आमच्याबरोबर यावे.

## उद्याचे निकाल महायुतीच्या उत्तम भविष्याचे असतील मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला विश्वास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचा निकाल रविवारी जाहीर होणार आहे. त्याआधीपासूनच राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी जल्लोष करायला सुरुवात केली आहे. नागपुरात माध्यमांशी बोलताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत भाजपा आणि महायुतीला मोठं यश मिळणार असा विश्वास व्यक्त केला.

उद्याचा निकाल भाजपा आणि महायुतीसाठी विजयाचा दिवस असणार आहे. भाजपाला कधी मिळालं नाही, एवढं यश नगरपरिषद निवडणुकीत मिळणार आहे. जिथं आम्ही यापूर्वी कधीच जिंकलो नव्हतो. त्या नगरपालिका आम्ही जिंकणार आहोत, असा दावा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. निवडणुकीच्या प्रचारामध्ये आम्ही बघितलं की मतदारांचा कल



भाजपाच्या बाजूनच आहे. म्हणून आमचा मोठा विजय होणार, असं मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

महायुतीत अनेक ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नाही. अजित पवार यांना त्यांच्या पक्षाचे अधिकार आहेत. महायुतीत आम्ही करत आहोत. मात्र मोठ्या संख्येनं कार्यकर्ते अपेक्षा ठेवून आहेत. त्यामुळं सर्वांना संधी मिळू शकत नाही. काही ठिकाणी राष्ट्रवादी वेगळी लढेल. तिथं आमच्यात मैत्रीपूर्ण लढत होईल. मात्र, त्यामुळं कटूता निर्माण होणार नाही याची काळजी आम्ही घेऊ, असं मंत्री बावनकुळे यांनी सांगितलं.

दोन दिवसात मुंबईतील भाजपा आणि शिवसेनेची कोअर कमिटी बसून अंतिम निर्णय करणार आहे. पहिल्या टप्प्यात शिवसेना आणि भाजपाचे कोअर कमिटीचे मेंबर चर्चेसाठी बसत आहेत, अशी माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

## वन विभागाच्या लाकूड विक्रीत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे गंभीर आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर**

विदर्भातल्या वनांमधून निघणाऱ्या लाकडांची खुल्या पद्धतीने विक्री करून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केला जात आहे, असा गंभीर आरोप करणारी जनहित याचिका ॲड. अरविंद मून यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल केली आहे. लाकडांची खुल्या पद्धतीने विक्री बंद करून ई-लिलाव विक्री प्रक्रियेचे पालन करण्यात यावे, अशी मागणी या याचिकेद्वारे करण्यात आली आहे.

विदर्भामध्ये घनदाट वने आहेत. त्यामुळे राज्यातील ८० टक्के प्रमुख लाकूड डेपो विदर्भातच आहेत. या डेपोंमधील लाकडांचा दर महिन्यात लिलाव केला जातो. त्यातून राज्य सरकारला कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळतो. ई-गव्हर्नन्स धोरण-२०११ आणि ३ डिसेंबर २०१४ रोजीच्या अधिसूचनेनुसार याकरिता ई-लिलाव प्रक्रियेचा उपयोग करणे बंधनकारक आहे. परंतु, वनाधिकारी ई-लिलाव प्रक्रिया डावलून खुल्या विक्रीला प्रोत्साहन देत आहेत.

२०२२-२३ पासून हा बेकायदेशीरपणा वाढला आहे. यासंदर्भात महाराष्ट्र वन विकास महामंडळाला तक्रार केली असता, त्यांनी योग्य दखल घेतली नाही, असे याचिकाकर्त्याचे म्हणणे आहे. वन सचिवांना नोटीस बजावली. या प्रकरणावर शुक्रवारी न्यायमूर्तिद्वय अनिल किलोर व रजनीश व्यास यांच्यासमक्ष सुनावणी झाली. त्यानंतर न्यायालयाने वन व महसूल विभागाचे प्रधान सचिव, प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि महाराष्ट्र वन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांना नोटीस बजावून दहा आठवड्यांत उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले. याचिकाकर्त्यातर्फे ॲड. निर्भय चव्हाण यांनी बाजू मांडली.

## अमरावतीत राष्ट्रवादी (अजित पवार गट) आमदार संजय खोडके यांचा अपघात

### रीम्स हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे विधान परिषदेचे आमदार संजय खोडके यांचा आज अमरावती शहरात अपघात झाला. महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांच्या बैठकीसाठी जात असताना एका फोरव्हिलर वाहनाने त्यांना धडक दिल्याची माहिती आहे.

या अपघातात आमदार संजय खोडके यांच्या पायाला तसेच मणक्याला दुखापत झाली असून त्यांना तत्काळ उपचारासाठी अमरावती येथील रीम्स हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांच्यावर



उपचार सुरू असून प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

अपघाताची माहिती मिळताच पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच समर्थकांनी रुग्णालयात गर्दी केली आहे. या घटनेबाबत अधिक तपास सुरू असून नेमका अपघात कसा झाला याची चौकशी संबंधित यंत्रणांकडून केली जात आहे.

## भाजप उमेदवाराचा ठाकरेंच्या उमेदवारावर हल्ला

### चाकू हल्ल्याचा प्रयत्न, जीवे मारण्याचीही धमकी; वाशिम येथील घटनेने राजकारण तापले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०वाशिम**

वाशिम येथील भाजपच्या एका उमेदवाराकडून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवारावर चाकू हल्ल्याचा प्रयत्न झाल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या घटनेमुळे शहरात तणाव निर्माण झाला असून, भाजप उमेदवाराविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाशिम जिल्ह्यातील लाखाळा परिसरात शुक्रवारी मध्यरात्री १.३० च्या सुमारास ही घटना घडली आहे. ठाकरे गटाचे उमेदवार गुड्डू उर्फ प्रवीण डोळे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, भाजप उमेदवार सतीश उर्फ गल्ला वानखेडे यांनी निवडणुकीच्या कारणावरून त्यांच्याशी वाद घातला. तसेच त्यांना जीवे मारण्याची धमकीही दिली. प्रवीण डोळे हे आपल्या मित्रांसोबत चर्चा करत होते. त्यावेळी सतीश वानखेडे तिथे आले. यावेळी निवडणूक व मतदानाच्या मुद्यावरून त्यांच्यात वाद झाला. हा वाद वाढल्यानंतर वानखडे यांनी डोळे यांच्यावर चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

संपादकीय ......

# प्रबोधनाचे चालते-बोलते विद्यापीठ

*अंधश्रद्धा निर्मूलन, अस्पृश्यता निवारण, शैक्षणिक क्षेत्र, वृक्षारोपण, गोरक्षण, हुंडाबंदी आणि दारूबंदी चळवळ अशा अनेकविध क्षेत्रांत भरीव आणि मोलाचे कार्य केलेल्या संत गाडगेबाबांचा उल्लेख एक थोर समाजसुधारक, लोकसेवक आणि निष्काम कर्मयोगी असा केला जातो. आज त्यांची पुण्यतिथी त्यानिमित्ताने...*

*संत गाडगेबाबा हे महाराष्ट्रातील समाजसुधारणा आणि विवेकी विचारांचे थोर समाजसुधारक होते. दि. २३ फेब्रुवारी १८७६ रोजी शेणगाव (जि. अमरावती) येथे जन्मलेल्या संत गाडगेबाबांनी संपूर्ण आयुष्य लोकसेवा आणि प्रबोधनासाठी समर्पित केले. गाडगेबाबांनी आयुष्यभर समाजामध्ये विधायक बदल व्हावेत, विषमता, अज्ञान, अस्वच्छता दूर व्हावी आणि खर्याअर्थाने समाज आधुनिक व्हावा, यासाठी अत्यंत मूलभूत असे प्रयत्न केले. संत गाडगेबाबांच्या जीवन आणि कार्यातून आधुनिक विचार आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा नवा अर्थ आजही आपल्याला सापडतो. गाडगेबाबांनी आपल्या प्रत्यक्ष कृतीतून समाजामध्ये श्रमाचे महत्त्व प्रस्थापित करण्यासाठी केलेले काम अत्यंत मोलाचे आहे. सार्वजनिक स्वच्छतेसाठी त्यांनी आपल्या हाती खराटा घेऊन स्वतः कृतिशील आदर्श घालून दिला. त्यांच्या हाती असणारा खराटा हे केवळ स्वच्छतेचे साधन म्हणून नव्हे, तर सामाजिक आरोग्य, श्रम प्रतिष्ठा, सामाजिक समता, ध्येयनिष्ठा आणि सामूहिक आनंदाच्या संवर्धनाचा एक अविभाज्य भाग होता.*

*गाडगेबाबांनी आयुष्यभर समाजातील शोषणकारी अंधश्रद्धा नष्ट व्हाव्यात, यासाठी अतिशय तळमळीने प्रयत्न केले. शोषणकारी कर्मकांडे, अनिष्ठ रुढी-परंपरा नष्ट व्हाव्यात, यासाठी कसोशीने प्रयत्न केले. मुक्या प्राण्यांची हत्या करू नका, भ्रामक कर्मकांडे, नवसायास आणि भूतप्रेत यावर विश्वास ठेवू नका, असे गाडगेबाबा आपल्या कीर्तनातून लोकांना अंतरीच्या कळवळ्यातून सांगत राहिले. दगडात देव शोधण्यापेक्षा माणसामधला आणि निर्सगातला देव पाहण्याची दृष्टी गाडगेबाबांनी समाजाला दिली.*

*गाडगेबाबांनी अतिशय सजगपणे लोकजीवनाचे निरीक्षण केले. त्यातून देवधर्माच्या नावावर चाललेले गरिबांचे आर्थिक-मानसिक आणि शारीरिक शोषण, हिंसा यांचे एक विदारक चित्र त्यांनी अनुभवले. सावकारशाहीचा विळखा, त्याचबरोबर शिक्षणाच्या अभावामुळे शेतकरीवर्गाच्या पिढ्यान् पिढ्या कशा वाया जात आहेत, हेही अगदी त्यांनी जवळून पाहिले. शेतकर्यांचे शिक्षणाच्या माध्यमातून प्रबोधन झाले, तरच त्यांच्या समस्या खर्याअर्थाने सुटतील व त्यांचे जीवन सुखी होईल, या भावनेतून त्यांनी राज्यभर शिक्षणाचा जागर केला. तसेच 'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला' हे त्यांचे आवडते भजन होय.*

*गाडगेबाबा म्हणजे समाजाच्या जडणघडणीसाठी दिवस-रात्र राबणारे कर्मयोगीच होते. समाज आरोग्यसंपन्न आणि निकोप व्हावा, नेहमी आनंदी राहावा, यासाठी त्यांनी व्यसनमुक्तीसाठी अहोरात्र प्रबोधन केले. काहीजण ध्येयप्राप्तीसाठी अपार कष्ट करतात, तर काहीजण व्यसनाच्या आहारी जाऊन कष्ट करून मिळवलेला पैसा व्यसनासाठी घालवतात आणि म्हणूनच कीर्तनाच्या माध्यमातून व्यसनमुक्तीसाठी समाजाला प्रबोधनाची हाक दिली. गाडगेबाबांकडून आपण आजच्या काळात कोणता आदर्श घेऊ शकतो, याचा विचार केल्यास प्रत्यक्ष कृतीमधून लोकांपुढे आदर्श निर्माण करण्याचे कार्य गाडगेबाबांनी केलेले जाणवते. दिवसभर हातात झाडू घेऊन रस्ते स्वच्छ करण्याचे काम केले. रात्री कीर्तनाच्या माध्यमातून लोकांची मने स्वच्छ आणि निर्मळ करण्याचे कार्य केले. केवळ उपदेश करण्यापेक्षा उपदेशाला कृतीची जोड दिली. त्याचप्रकारे आपण कृती आणि ज्ञान यांचा समन्वय साधून लोकशिक्षणाचे कार्य करावे, असा संदेश गाडगेबाबांच्या चरित्रातून आजच्या काळात मिळू शकतो.*

# एकात्मिक फलोत्पादन विकास अभियांतर्गत कांदा व लसून साठवणूक गृहासाठी अर्थसहाय्य

## शेतकऱ्यांनी महाडीबीटीवर अर्ज करण्याचे आवाहन

### कांदाचाळ/लसूण साठवणूक गृह उभारणीसाठी ५० टक्के अनुदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

राज्यात कांदापिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असून शेतकरी सर्वसाधारणपणे कांदा जमिनीवर पसरवून ठेवून किंवा स्थानिकरित्या तयार केलेल्या चाळीमध्ये कांद्याची साठवणूक करतात. त्यामुळे कांदा सडून मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. तसेच कांद्याची प्रत व टिकाऊपणा यावर विपरीत परिणाम होतो. शास्त्रशुध्द कांदाचाळ उभारणीमुळे कांद्याची योग्य गुणवत्ता राखली जाऊन शेतकऱ्यांना अधिक नफा मिळत असल्याने कांदाचाळ उभारणीकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे. यामुळे एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये कमी खर्चाचे कांदाचाळ/लसूण साठवणूक गृह हा घटक राबविण्यात येत असून ५ ते २५ मे.टन, २५-५०० मे.टन व ५००-१००० मे.टन क्षमतेच्या कांदा चाळी/लसूण साठवणूक गृह उभारणीसाठी इच्छुक शेतकऱ्यांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहे, अशी माहिती महाराष्ट्र फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळाचे संचालक अशोक किरन्नळी यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

कांदा पिकांचे साठवणूकीत होणारे नुकसान कमी करणे, कांदा पिकाची हंगामामध्ये आवक वाढून




कांद्याचे भाव कोसळणे तसेच हंगामाव्यतिरिक्त कांद्याचा तुटवडा निर्माण होऊन भाव वाढणे अशा समस्येवर अंशत: नियंत्रण मिळविणे आदी योजनाचा उद्देश आहे.

**प्रकल्पखर्च व अनुज्ञेय अनुदान मर्यादा पुढीलप्रमाणे**

या योजनेअंतर्गत सर्वसाधारण व अनुसूचित क्षेत्राकरीता ५ ते १००० मेट्रिक टन क्षमतेच्या कांदाचाळ / लसूण साठवणूक गृहासाठी अनुदान देण्यात येणार आहे. तसेच एकुण भांडवली खर्चाच्या ५० टक्के अनुदानप्रमाणे देय राहील.१) ५ ते २५ मे.टन क्षमतेच्या रु आठ हजार ग्राह्य प्रकल्प खर्चात कमाल चार हजार प्रति मे.टन अर्थसहाय्य दिले जाईल.२) २५ ते ५०० मे.टन क्षमतेच्या रु सात हजार ग्राह्य प्रकल्प खर्चात कमाल तिन हजार पाचशे प्रति मे.टन अर्थसहाय्य दिले जाईल.३) ५०० ते १००० मे.टन क्षमतेच्या रु सहा हजार ग्राह्य प्रकल्प खर्चात कमाल तिन हजार प्रति मे.टन अर्थसहाय्य दिले जाईल.

उपरोक्त सदर प्रकल्पाचा एकूण खर्च ३० लाखांपेक्षा अधिक झाल्यास बँक कर्ज घेणे अनिवार्य असून अनुदानाची रक्कम ही बँक कर्जाच्या परतफेडीच्या स्वरूपात देण्यात येणार आहे.

लाभार्थी पात्रतेचे निकष पुढीलप्रमाणे :- शेतकऱ्यांनी योजनेअंतर्गत अर्ज करताना त्याच्या स्वत:च्या मालकीची जमीन असणे आवश्यक आहे, ७/१२ वर कांदा पिकाची नोंद असणे आवश्यक आहे, शेतकऱ्याकडे कांदापिक असणे बंधनकारक आहे, सदर योजनेचा लाभ वैयक्तिक कांदा उत्पादक शेतकरी, शेतकऱ्यांचा गट, स्वयंसहायता गट (ज्यामध्ये कमीत कमी २५ सदस्य असतील) शेतकरी महिला गट, शेतकऱ्यांचे उत्पादक संघ नोंदणीकृत शेतीसंबंधी संस्था, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, सहकारी पणन संघ यांना घेता येईल.

*अर्ज करण्याची पध्दत :*महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्यासाठी संकेतस्थळ: हींींं://ारहरवलीं.ारहरीरीहींीर.सेींं.ळप उपरोक्त योजनेच्या अधिक माहितीसाठी संबधित नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषि विभागाद्वारे करण्यात आले आहे.

# काळा की पिवळा खजूर आरोग्यदायी?

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक**

खजूर हा भारतीय आहार संस्कृतीतला जुना परंतु अत्यंत उपयुक्तअसा सुकामेवा मानला जातो. आयुर्वेदाने त्याला नैसर्गिक शक्तिवर्धक, प्रकृतीने उष्ण आणि हिवाळ्यात विशेष उपयोगी असे स्थान दिले आहे.






थकवा, अशक्तपणा, पचनातील अडचणी आणि रक्ताची कमी अशा अनेक समस्यांसाठी खारीक उपयुक्तमानला जाते. परंतु, बाजारात गडद काळी आणि फिकट पिवळी अशा दोन प्रकारात खारीक मिळत असल्याने अनेकांना यातील आरोग्यदायी प्रकार कोणता याबाबत संभ्रम असतो.

जेव्हा खजूर झाडावर नैसर्गिकरीत्या पूर्ण पिकतो, तेव्हा त्याचा रंग गडद काळा होतो. हा नैसर्गिक पिकण्याचा प्रक्रियेतून तयार झालेला खजूर खर्या अर्थाने पोषक घटकांचा पॉवरहाऊस ठरतो. त्यात आयर्न, कॅल्शियम, झिंक आणि इतर आवश्यक खनिजे नैसर्गिक स्वरूपात मुबलक प्रमाणात असतात. त्यामुळे शरीरातील रक्ताची कमतरता, स्नायूंचा अशक्तपणा, हाडांची घडी सैल होणे किंवा दीर्घकालीन थकवा अशा समस्यांमध्ये काळा छुहारा अत्यंत प्रभावी मानला जातो. आयुर्वेदातील 'रसायन' या संकल्पनेत बसणारी त्याची उष्ण तासीर हिवाळ्यात शरीरातील उष्णता संतुलित करण्याचेही महत्त्वाचे कार्य बजावते.

याउलट पिवळी खारीक पौष्टिकतेच्या बाबतीत कमी असते. कारण, यामध्ये खजूर झाडावर पूर्ण पिकण्याआधीच तोडले जातात. अनेक व्यापारी त्यांना खाण्यायोग्य दिसावे म्हणून कधी कोमट पाण्यात, तर कधी साखरेच्या चाशनीत उकळतात. काहीवेळा रंग अधिक स्वच्छ दिसावा म्हणून पॉलिश अथवा 'ॲसिड वॉश' केल्याचीही चर्चा असते.

खजूर कसा खावा, हा आणखी एक महत्त्वाचा प्रश्न. आयुर्वेदानुसार सुकामेव्याचे गुणधर्म पूर्णपणे मिळवण्यासाठी त्याला भिजवून खाणे हितावह मानले जाते. रात्री पाण्यात भिजवलेला खजूर सकाळी रिकाम्या पोटी खाल्ल्यास शरीरात त्याचे शोषण अधिक प्रभावी होते. मात्र, दुप्पट फायदा हवा असल्यास खजूर दुधात उकळून खाण्याची पद्धत अधिक उपयुक्तठरते. दुधातील कॅल्शियम, प्रथिने आणि इतर सूक्ष्म पोषक घटक खजुरातील खनिजांशी एकत्र येऊन शरीराला अधिक सुदृढ बनवतात आणि हिवाळ्यात आवश्यक उष्णताही प्रदान करतात.

# अमरावती जिल्ह्यात 'मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते' योजनेला सुरवात

## २४ डिसेंबरला कंत्राटदारांचे चर्चासत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती,**

राज्यातील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी बारमाही आणि दर्जेदार रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजना' सुरू केली आहे. या योजनेची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरुवात झाली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश शेत शिवारातील अतिक्रमित झालेले पाणंद रस्ते मोकळे करणे आणि तेथे दर्जेदार, बारमाही दळणवळणास योग्य रस्ते तयार करणे हा आहे. ग्रामीण भागातील या पायाभूत सुविधेमुळे शेतकऱ्यांना पीक कापणी, मशागत आणि शेतमाल बाजारपेठेत नेणे सोपे होणार आहे. ही कामे पूर्णपणे यंत्रसामग्रीच्या सहाय्याने केली जाणार असून, कामात पारदर्शकता आणि गुणवत्ता राखण्यासाठी इच्छुक




मशीनधारक व कंत्राटदारांकडून निविदा मागवण्यात येणार आहेत.या योजनेची कार्यपद्धती आणि निविदा प्रक्रिया कंत्राटदारांना नीट समजावी, यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे बुधवार, दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता अमरावती येथील कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना यांच्या कार्यालयात चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत मशिनधारकांशी सविस्तर चर्चा करून खोदकाम, माती, मुरुम वाहतूक आणि रोड रोलरने दबाई करणे यासाठीचा 'प्रति तास दर' निश्चित केला जाणार आहे. बैठकीनंतर जिल्हास्तरावर विधानसभा क्षेत्रनिहाय यंत्रधारकांचे एक पॅनेल तयार करण्यात येईल, जे प्रत्यक्ष रस्त्यांच्या कामासाठी जबाबदार असेल. जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत व इच्छुक मशिनधारकांनी आणि कंत्राटदारांनी या चर्चासत्राला उपस्थित राहण्याचे आवाहन उपजिल्हाधिकारी यांनी केले आहे.

# निवडणुकीमुळे विद्यापीठाच्या हिवाळी-२०२५ १४ ते १६ जानेवारी पासून सुरू होणा-या लेखी परीक्षा पुढे ढकलल्या

## विद्यार्थ्यांनी नोंद घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती**




संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी - २०२५ लेखी परीक्षेची वेळापत्रके विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. तथापि राज्यात आगामी होऊ घातलेल्या महानगरपालिकांच्या निवडणुकांमुळे १४, १५ व १६ जानेवारी, २०२६ पासून सुरू होणा-या लेखी परीक्षा पुढे ढकलण्यात येत असून १४ जानेवारी रोजीच्या परीक्षा २७ जानेवारीपासून, १५ जानेवारी रोजीच्या परीक्षा २८ जानेवारी व १६ जानेवारी रोजीच्या परीक्षा ह्या २९ जानेवारी पासून होतील, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून कळविण्यात आले आहे.

यासंदर्भात सर्व प्राचार्य, केंद्राधिकारी, संबंधित महाविद्यालये, परीक्षा केंद्र यांना पत्राव्दारे परीक्षा विभागाकडून कळविण्यात आले असून, संबंधितांनी याची सर्व विद्यार्थ्यांना जाणीव करुन द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या वेबसाईटवर परीक्षा विभागाच्या अधिका-यांच्या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# वेलवर्गीय भाजीपाला पिकांसाठी कीड नियंत्रणासाठी उपाययोजना, वाचा सविस्तर

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक-** वेलवर्गीय भाजीपाला पिकांमधील कीड नियंत्रणासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन (खझच्) पद्धतीचा अवलंब करणे महत्त्वाचे आहे. कीड नियंत्रणासाठी काय काय उपाययोजना कराव्यात हे समजून घेऊयात...




**वेलवर्गीय भाजीपाला पिके - कीड नियंत्रण-** ला फळांवर फळमाशीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे.

नियंत्रणासाठी फुले येण्याच्या काळात 'क्यू ल्यूर' कामगंध सापळे एकरी ५ या प्रमाणात मंडपात लावावेत.

फळांची काढणी योग्य पक्वतेस करावी. प्रादुर्भावग्रस्त फळांमधून फळमाशीची उत्पत्ती वाढत असल्याने अशी फळे गोळा करून नष्ट करावीत.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**वेलांखालील माती वेळोवेळी हलवून घ्यावी.-** कारली, पडवळ, दुधी भोपळा, दोडका या पिकांवर तांबडे भुंगेरे, मावा, तुडतुडे, फुलकिडे, पांढरी माशी इत्यादी किडींचा प्रादुर्भाव दिसून येतो.

यासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची किंवा अँझाडीरॅक्टीन (३०० पीपीएम) ५ मि.ली. प्रति लिटर पाणी या प्रमाणे प्रतिबंधात्मक फवारणी करावी.

**कोबीवर्गीय पिके -** आंतरमशागत कोबीवर्गीय पिकांची मुळे उथळ असल्यामुळे पाण्याच्या पाळ्या वरचेवर नियमित द्याव्यात.

या पिकास गड्डा तयार होण्याच्या वेळी पाण्याचा ताण पडल्यास गड्डे लहान राहतात.

लागवडीनंतर गरजेनुसार एक किंवा दोन खरपण्या करून माती भसभशीत आणि पीक तणविरहित ठेवावे. **- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी.**

# विद्यापीठाच्या हिवाळी-२०२५ लेखी परीक्षांचे सुधारित वेळापत्रक जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२०अमरावती**



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी - २०२५ लेखी परीक्षेची वेळापत्रके विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. सदर वेळापत्रकातील एम.ई. (डिजिटल इलेक्ट्रॉनिक्स) सेमि.-३ (सी.बी.सी.एस.), बी.एस्सी. (ॲनिमेशन) सेमि.-३ (एन.ई.पी.), बी.ए. सेमि.-३ (एन.ई.पी.), बी.फार्म. सेमि.-१ आणि एम.फार्म सेमि.-१ या परीक्षांच्या वेळापत्रकात दुरुस्ती/सुधारित/नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात येत असून विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून कळविण्यात येत आहे. यासंदर्भात सर्व प्राचार्य, केंद्राधिकारी, संबंधित महाविद्यालये, परीक्षा केंद्र यांना पत्राव्दारे परीक्षा विभागाकडून कळविण्यात आले असून, संबंधितांनी याची सर्व विद्यार्थ्यांना जाणीव करुन द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या वेबसाईटवर परीक्षा विभागाच्या अधिका-यांच्या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# अमरावती महानगरपालिकेत निवडणूक पूर्वतयारीसाठी बैठक

## बैठकीत नियंत्रण अधिकारी, सहाय्यक अधिकारी यांची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती** - महानगर पालिकेच्या आगामी निवडणुकी साठी अमरावती महानगर पालिकेच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये निवडणूक अधिकारी व महानगर पालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वाची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत नियंत्रण अधिकारी, सहाय्यक अधिकारी तसेच संबंधित कर्मचारी उपस्थित होते.बैठकीत विविध निवडणूक संबंधित कामकाजाचे सविस्तर आढावा घेण्यात आला. यामध्ये कामावर देखरेख व नियंत्रण, आचारसंहिता कक्षाचे व्यवस्थापन, कायदा सुव्यवस्था, तसेच ऋडढ, डडढ, तडढ आणि ततढ या पथकांचे नियोजन व कार्यक्षम नियंत्रण या बाबींचा समावेश होता. तसेच पोलीस बंदोबस्त, उतखऋखड व एडचड प्रणालीतील कामकाज आणि तक्रार कक्षाचे स्थापत्य व नियंत्रण यावरही विशेष भर देण्यात आला.बैठकीत एक खिडकी सेवा, मनुष्यबळ व्यवस्थापन, मतदान व मतमोजणी कर्मचारी व्यवस्थापन, मतमोजणी केंद्र व डीींपस ठेो



व्यवस्थापन, डींशश झिश्ररप, मतदार केंद्र व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्थापन, निवडणूक कर्मचारी प्रशिक्षण, साहित्य पुरवठा आणि आवश्यक फॉर्मच्या छपाई व वितरण याबाबत सविस्तर चर्चा झाली.त्याचबरोबर एतच् इंचार्ज व संबंधित साहित्याचे वाटप, फर्निचर पुरवठा, खर्चाचा हिशोब, लेखा परिक्षण, चउचउ जाहिरात प्रमाणन, माहिती कक्ष व्यवस्थापन, स्थायी समिती हॉल व्यवस्थापन, अहवाल सादरीकरण, पत्रव्यवहार, झझढ व जलीशींशी नोट्स तयार करणे, संगणकीकरण, माहिती संकलन व रिपोर्ट तयार करणे या बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.मतदान केंद्र व मतमोजणी केंद्राची स्वच्छता तसेच मतदान व मतमोजणी प्रक्रियेदरम्यान भोजन व्यवस्था आणि इतर सुविधा यावरही बैठक काळजीपूर्वक थांबून चर्चा केली. झोन कार्यालय व्यवस्थापन व कर्मचारी व्यवस्थापन याबाबत नियोजनाचा आढावा घेतला.निवडणूक अधिकारी व महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी बैठकीत अधिकाऱ्यांना सर्व बाबतीत सतत नियंत्रण ठेवण्याचे आणि वेळेवर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक पायरीवर नीट नियोजन, सुरक्षितता व पारदर्शकता राखणे अत्यंत आवश्यक आहे.ही बैठक अमरावती महानगरपालिकेतील निवडणूक तयारीतर्फे घेतलेल्या उपाययोजनांचा सखोल आढावा असून, आगामी निवडणुकीत पारदर्शक, सुरक्षित व सुचारू मतदान प्रक्रियेची सुनिश्चितता करण्यासाठी महत्त्वाची पावले उचलण्यात आली आहेत.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. २० डिसेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# नांदगाव पेठमध्ये शंकरपटाची जय्यत तयारी

## २१ डिसेंबर रोजी होणार भव्य उद्घाटन

### संत काशिनाथ महाराज पुण्यतिथीनिमित्त ऐतिहासिक आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० नांदगाव पेठ**

ग्रामदैवत संत श्री काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त नांदगाव पेठ येथे तब्बल दोन दशकांनंतर पुन्हा एकदा भव्य शंकरपटाचे आयोजन करण्यात आले असून, या ऐतिहासिक उपक्रमासाठी परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. युवा शेतकरी मित्र परिवार व स्व. सौ. हिराबाई गुल्हाने चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २१ व २२ डिसेंबर रोजी हा शंकरपट पार पडणार आहे. शंकरपटाच्या यशस्वी आयोजनासाठी सध्या पुसदकर कला महाविद्यालयासमोरील विशाल मैदानात जय्यत तयारी सुरू असून ती अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. शंकरपटप्रेमी प्रेक्षकांसाठी स्वतंत्र आसनव्यवस्था, धुरकर्यांसाठी सुसज्ज मैदान, अपघातप्रसंगी तत्काळ वैद्यकीय सुविधा तसेच सुरक्षेसाठी प्रशिक्षित रक्षकांची नियुक्ती करण्यात येणार आहे.धार्मिकता, परंपरा आणि कृषिसंस्कृतीचा सुंदर संगम घडवणारा हा शंकरपट नांदगाव पेठच्या सांस्कृतिक वारशाला नवे बळ देणारा ठरणार आहे. लाखो रुपयांच्या आकर्षक बक्षिसांची लयलूट हे या शंकरपटाचे विशेष आकर्षण असून, त्यामुळे जिल्हाभरातील बैलगाडी मालक, शेतकरी वर्ग आणि रसिक प्रेक्षक या स्पर्धेकडे मोठ्या अपेक्षेने पाहत आहेत. दोन दशकांच्या प्रतीक्षेनंतर पुन्हा होत असलेल्या या भव्य शंकरपटामुळे नांदगाव पेठसह परिसरात प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. स्पर्धकांसाठी पाण्याची योग्य व्यवस्था, प्रेक्षकांसाठी सोयीस्कर आसनव्यवस्था, सुव्यवस्थित नियंत्रण व सुरक्षिततेची जबाबदारी आयोजन समितीने काटेकोरपणे हाती घेतली आहे.संत काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवाच्या निमित्ताने होत असलेला हा ऐतिहासिक शंकरपट नांदगाव पेठच्या कृषी व सांस्कृतिक परंपरेला नवचैतन्य देणारा ठरणार असून, या उपक्रमात धुरकर्यांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजन समितीचे रुपेश इंगळे, भूषण तुळे, अक्षय डाखोडे, अंकुश बोबडे, अतुल हटवार, वैभव धर्मे, श्याम तायडे, चरणभाऊ खराटे, ज्ञानेश्वर ढेंगे व भास्कर राजुरकर यांनी केले आहे.

## खुनाचा रक्तरंजित बदला

# भरदिवसा युवकाची निर्घृण हत्या घटनेनंतर चार आरोपी पसार

### नांदगाव पेठ येथील बोरनदी धरणाच्या प्रवेशद्वारावरील घटना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २० नांदगाव पेठ**

वाळकी रोडस्थित बोरनदी प्रकल्पाच्या प्रवेशद्वारासमोर शुक्रवारी दुपारी सुमारे ३:३० वाजताच्या सुमारास चार हल्लेखोरांनी मिळून धारदार शस्त्राने सपासप वार करत एका युवकाची निर्घृण हत्या केली.या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.हत्या झालेल्या युवकाचे नाव मन्या उर्फ मंथन रवींद्र पाळनकर (१७) रा.शिलांगण रोड, सातूरणा अमरावती असे आहे.

मन्या उर्फ मंथन हा काही महिन्यांपूर्वी अमरावतीत झालेल्या यश रोडगे हत्याकांडातील आरोपी असल्याचे समजते. आठ दिवसांपूर्वी गुन्हे शाखेने मंथन ला एका प्रकरणात अटक केली होती त्यांनतर तो जमानत वर बाहेर आला होता.शुक्रवारी सकाळी घटनेतील एका आरोपीने मंथन ला मॅसेज करून वाळकी रोड वर बोलावले होते.मंथन साडे तीन वाजताच्या दरम्यान विना नंबरप्लेटच्या स्पोर्ट बाईक ने बोरनदी प्रकल्पाच्या मुख्य प्रवेशद्वारावर पोहचला आणि काही समजण्याच्या आतच चार जणांनी घेरून त्याच्या मानेवर,हातावर आणि पोटावर चाकूने वार केले. मंथन रक्ताच्या थारोळ्यात घटनास्थळी पडलेला असतांना रस्त्याने जाणाऱ्या नागरिकांनी घटनेची माहिती नांदगाव पेठ पोलिसांना दिली. घटनेची माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्यासह पोलीस पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

फॉरेन्सिक टीम देखील घटनास्थळी पोहचली होती. परिसराची नाकाबंदी करून पंचनामा सुरू करण्यात आला. तसेच गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, कैलास फुंडकर यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी उपस्थित होते.

प्राथमिक माहितीनुसार, मृतक मंथन पाळनकर हा काही दिवसांपूर्वी घडलेल्या यश रोडगे हत्याकांडातील आरोपी असल्याचे समोर आले आहे. याच पार्श्वभूमीवर यश रोडगेच्या हत्येचा बदला घेण्याच्या उद्देशानेच मंथनची हत्या करण्यात आल्याची जोरदार चर्चा परिसरात सुरू होती.

दिवसाढवळ्या झालेल्या या हत्येमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. पोलीस प्रशासनाने हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना केली असून सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक माहिती व प्रत्यक्षदर्शींच्या आधारे तपास वेगात सुरू आहे.या थरारक घटनेने नांदगाव पेठ परिसर हादरून गेला असून पुढील तपासातून आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### अनेक दिवसांपासून मंथन होता रडारवर

यश रोडगे हत्या प्रकरणानंतर मंथन पाळनकर अनेक दिवसांपासून आरोपींच्या रडारवर होता.मात्र सातूर्णा आणि नवाथे परिसरात मंथनचा बोलबाला असल्यामुळे तसेच त्याच्यासोबत आठ ते दहा युवकांची टोळी असल्यामुळे त्या परिसरात मंथनवर हल्ला करणे शक्य नव्हते. त्यामुळे त्याला शुक्रवारी मॅसेज करून वाळकी रोडवर बोलावण्यात आले आणि त्याची हत्या करण्यात आली.

### आरोपींच्या दिशेने पथक रवाना

मन्या उर्फ मंथन पाळनकर याच्या हत्येची माहिती मिळताच पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी पंचनामा करून पुढील तपास सुरू करण्यात आला. मंथन ज्या वाहनाने घटनास्थळी आला होता त्या वाहनाच्या आधारे मालकाची माहिती घेऊन तपासाची चक्रे वेगाने फिरवण्यात आली आहेत.तसेच हत्या करणाऱ्या आरोपींचा माग काढण्यासाठी विशेष पथक तयार करून त्यांच्या संभाव्य दिशेने रवाना करण्यात आले आहे. पोलिसांकडून तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू असून लवकरच या हत्याप्रकरणातील आरोपींना अटक करण्यात येईल.


**दिनेश दहातोंडे** वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पो.स्टे. नांदगाव पेठ

### प्रवेशद्वारावर हत्या, धरणावर रासलीला

बोरनदी प्रकल्पाच्या प्रवेशद्वारावर मंथनची हत्या होऊन परिसरात पोलीस छावणी उभी राहिली असतानाच, धरण परिसरात ४ ते ५ अल्पवयीन जोडप्यांची रासलीला सुरू असल्याचा प्रकार उघडकीस आला. पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करत सर्वांना हुसकावून लावून समज दिली. हा परिसर अनैतिक कृत्यांचा अड्डा बनत असून दररोज शेकडो प्रेमीयुगल येथे येतात, यामुळे अनेक अनुचित घटना घडत असल्याचे वास्तव समोर येत आहे. त्यामुळे या परिसरात कायमस्वरूपी पोलीस बंदोबस्त व कडक कारवाईची गरज व्यक्त होत आहे.

# मनपा निवडणूकीसाठी आचारसंहिता कक्ष स्थापन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२०अमरावती**



महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, मतमोजणीच्या निकालापर्यंत महानगरपालिका कार्यक्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू केली आहे. याअनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रात आदर्श आचारसंहिता उल्लंघनासंबंधी तक्रारी नोंदविण्यासाठी तसेच त्यावर तात्काळ व आवश्यक कार्यवाही करण्यासाठी आचारसंहिता कक्षाची स्थापना केली आहे. या कक्षाच्या प्रमुखपदी श्री राम लंके उपजिल्हाधिकारी मो.क्र.८८८८३५२८०० यांची नियुक्ती करण्यात आली असून, नागरिक व राजकीय पक्षांनी आचारसंहिता उल्लंघनाबाबतच्या तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. सदर तक्रारी आचारसंहिता कक्ष मध्य झोन क्र.२ राजापेठ, अमरावती महानगरपालिकेची इमारत, पहिला मजला येथे करता येणार आहे. निवडणूका मुक्त, निष्पक्ष व शांततापूर्ण वातावरणात पार पडाव्यात, यासाठी नागरिकांनी व राजकीय पक्षांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे.

# उपद्रवींचा शहरातील रस्त्यांवर बेधुंद कहर...

## तलवारी- चाकू घेवून दहशत, तोडफोड दगडफेक, मारहाणअनेक गाड्या फोडल्या

### घरांवर दगडफेकअनेक निष्पाप लोकांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण

### तब्बल ८ ते १० संशयित आरोपी ताब्यात

### नवाथे ते शंकर नगर रोडपर्यंत समाजकंटकांचा धुडघूस







**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २० अमरावती** -शहरात जणू युपी... बिहार अवतरले की काय ? असे भयावह चित्र आता समोर येत आहे. आठ दिवसांपूर्वी जेवड नगरात खुलेआम काही बेधुंद युवकांनी हंगामा केला होता. त्यानंतर पुन्हा त्यापेक्षा भयावह थरार नवसारी ते शंकर नगर रोडपर्यंत शहरातील अनेकांनी अनुभवल्याने दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. तब्बल १२-१३ बाईकवरून आलेल्या उपद्रवींनी असा काही बेधुंद धुडगुस घातला की, चार-पाच ठिकाणीगाड्यांची तोडफोड, घरावर दगडफेक केली.काहींनी रस्त्यावर उभ्या असलेल्या लोकांनी मारहाण केली. या भयावह घटनेची माहिती मिळताच सर्व वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसह विविध पथके तात्काळ घटनास्थळी पोहोचली, आरोपींची ओळख पटवली आणि जोरदार शोध सुरू केला.शुक्रवारी दुपारी, राजापेठ पोलिस स्टेशन परिसरात राहणारा मंथन नावाचा १९ वर्षीय तरुणाची नांदगावपेठ पोलिस स्टेशन परिसरात निघृण हत्या करण्यात आली. यशच्या हत्येचा बदला घेण्यासाठी मंथनची हत्या करण्यात आली.

रात्री ९ वाजेच्या सुमारास, मृताचे सहकारी मोटारसायकलींवर रस्त्यावर उतरले आणि दहशत निर्माण केली.मृताच्या घराजवळ ट्रिपल-सीट मोटारसायकलींवर बसून जमलेल्या उपद्रवींनी प्रथम नवाथे चौकात गोंधळघातला. व्यापाऱ्यांना धमकावले आणि त्यांना त्यांची दुकाने बंद करण्यास भाग पाडले. त्यानंतर टोळी केडिया नगर परिसरात पोहोचली, जिथे त्यांनी काही घरांवर दगडफेक केली आणि लोकांशी गैरवर्तन करण्यास सुरुवात केली.

दुकाने आणिघरांवर जोरदार दगडफेक केल्यामुळे परिसरात घबराट पसरली. मद्यधुंद उपद्रवी तिथेच थांबले नाहीत. तिथून त्यांनी शंकर नगर रोडवरील गोल्ड जिमसमोरील दोन गाड्यांची तोडफोड केली आणि तिथे उपस्थित असलेल्या दोघांवर जीवघेणा हल्ला केला. त्यानंतर ते शंकर नगरमधील स्मशान भूमी रोडवरून पुढे गेले आणि बचत मॉलसमोर उभ्या असलेल्या आणखी दोन गाड्यांची तोडफोड केली.

### बडनेरा ते राजापेठ पर्यंत भीतीचे वातावरण

थंडीच्या काळात लोक जेवणानंतर आराम करत असताना, शहरातील अनेक भागात गोंधळामुळे आधीच दहशत निर्माण झाली होती. काही काळासाठी लोकांनी स्वतःला घरात कोंडून घेतले. परंतु जेव्हा परिस्थिती शांत झाली तेव्हा रस्त्यावर गर्दी जमली. त्यानंतरच है स्पष्ट झालें की शहरातील अनेक भागात हल्लेखोरांनी तोडफोड केली आणि गोंधळ माजवला. रात्री उशिरापर्यंत बडनेराते राजापेठ पर्यंत विविध भागात भीतीचे वातावरण होते.

### ८ ते १० संशयित ताब्यात

घटनेची माहिती मिळताच, डीबी पथक आणि गुन्हे शाखेच्या पोलिसांसह कोतवाली पोलिस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी घटनास्थळावरील सर्व सीसीटीव्ही फुटेज स्कॅन करण्यास सुरुवात केली. ओळख पटल्यानंतर, पोलिसांनी गुन्हेगारांचा शोध सुरू केला. दरम्यान, डीपी रमेश धुमाळ आणि डीपी शाम घुगे यांनी राजापेठ पोलिस ठाण्यात तळ ठोकला. रात्री १२ वा. पर्यंत ८ ते १० संशयितांना ताब्यात घेण्यात आले होते, ज्यात काही अल्पवयीन मुलांचा समावेश होता. पोलिसांनी २० हून अधिक आरोपीविरुद्धगंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली होती.

# तळेगाव ठाकूर फाट्यावरील दिशादर्शक फलक गायब

### ग्रामस्थांत संभ्रम व नाराजी





**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०तिवसा**

राष्ट्रीय महामार्गापासून सुमारे दीड किलोमीटर अंतरावर वसलेले तळेगाव ठाकूर गावाकडे जाणाऱ्या फाट्याजवळील भागात लावण्यात आलेले विविध फलक अचानक गायब झाल्याने परिसरात चर्चेला उधाण आले आहे. दिनांक १८ डिसेंबर रोजी सकाळच्या सुमारास नागरिकांना फाट्याजवळ प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, श्री राधास्वामी सत्संग केंद्र तसेच काही राजकीय पक्षांचे लावलेले फलक जमिनीवर पडलेल्या अवस्थेत आढळून आले.हे फलक नेमके कोणी आणि कशासाठी काढले, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. परिणामी गावकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध तर्कवितर्क लढविले जात आहेत. विशेष म्हणजे, तळेगाव ठाकूरकडे जाण्यासाठी आजतागायत ठोस दिशादर्शक फलकच नसल्याने बाहेरून येणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. फाट्यावरील फलक काढण्यामागे नेमका कोणाचा हात आहे, याचा त्वरित शोध घेऊन तळेगाव ठाकूरकडे जाण्यासाठी कायमस्वरूपी दिशादर्शक फलक व प्रवेशद्वार उभारण्यात यावे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. अन्यथा येत्या काळात ग्रामस्थ आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तिवसा तालुक्यातील अनेक गावांच्या मुख्य प्रवेश मार्गावर आकर्षक प्रवेशद्वार (कमानी) उभारण्यात आल्या असताना तळेगाव ठाकूर या गावाला अद्यापही अशी कोणतीही कमान नसणे, ही बाब नाराजीचे कारण ठरत आहे. इतर गावांना ओळख देणाऱ्या सुविधा मिळतात, मात्र आमच्या गावाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.मारोती निमकरग्रामस्थ, तळेगांव ठाकूर

फाट्यावरील दिशादर्शक बोर्ड व फलक काढून टाकल्याने तळेगाव ठाकूरकडे येणाऱ्या बाहेरगावच्या प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. तळेगाव ठाकूरचा स्वतंत्र फलक नसल्यामुळे अनेक प्रवाशांना तळेगाव श्यामजी पंत आणि तळेगाव ठाकूर यात संभ्रम निर्माण होत आहे. सदर प्रकार गंभीर असून याची तातडीने दखल घेणे गरजेचे आहे. प्रशासनाने त्वरित योग्य दिशादर्शक फलक उभारावेत.

-**किशोर दिवे** पोलीस पाटील, तळेगांव ठाकूर

# गल्ली मोहल्लयातील गुन्हेगारांना प्रतिबंधात्मक लगाम

## रेकॉर्डवरील गुन्हेगारांची पोलीस ठाण्यात हजेरीला सुरुवात

### फरार आरोपींची यादी तयार करणे सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

महापालिका निवडणुकीची शहरात आचारसंहिता जाहिर झाल्यानंतर पोलिस विभागाने गल्ली मोहल्लयातील गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक लगाम कसायला सुरुवात केली आहे. आयुक्तालयातील सर्व १० पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील गुन्हेगारांना पोलिस ठाण्यात हजर करण्यात आले :अनुचित प्रकार घडू नये, शांतता राहावी, यासाठी ही कारवाई करण्यात येत आहे. त्यामुळे पोलिसांनी जुन्या आणि नवीन दोन्ही प्रकारच्या वॉन्टेड आरोपींना अटक करण्यास सुरुवात केली आहे.

गेल्या दोन दिवसांत ७० पेक्षा अधिक लोकांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे.आगामी महापालिका निवडणुकाच्या शहरातील कायदा अनुषंगाने आणि सुव्यवस्थेची तयारी सुरू करीत सीपी राकेळ ओला संबंधित विभागांसोबत बैठका घेत मार्गदर्शक सूचना देत आहे.

गुरुवारी संध्याकाळपासून, सर्व पोलिस ठाण्यांच्या डीबी पथकांनी दोनपेक्षा जास्त गंभीर प्रकरणांमध्ये नाव असलेल्या आरोपींना अटक करण्यास आणि पोलिसठाण्यात त्यांची हजेरी लावण्यास सुरुवात केली. शिवाय, पोलिसांच्या आवाहनावर अनेक गुन्हेगार स्वतःहून आले. त्यांना शांतता राखण्याचे बजावले. प्रतिबंधात्मक कारवाईच्या भीतीने गैरहजर राहणाऱ्यांची विशेष यादी तयार करण्याचे आदेश देण्यात आल्याचेही वृत्त आहे. त्यांना काही दिवसांत पोलिस आयुक्तालयाच्या गेटवर उभे केले जाऊ शकते. ही कारवाई निवडणूक प्रक्रियेपर्यंत सुरू राहील.दरवर्षी, सण आणि निवडणूक पकियेदरम्यान, त्या आरोपींवर पोलिस नियंत्रण ठेवण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई आवशयक असते. त्याचप्रमाणे, जानेवारी ते १९ डिसेंबर या कालावधीत, शहर आयुक्तालयाच्या १० पोलिस स्टेशन क्षेत्रात ४,७५६ लोकांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. त्या तुलनेत २०२४ मध्ये ५,२०५ लोकांवर कारवाई करण्यात आली. तथापि, येत्या महापालिका निवडणुकांमुळे पोलिस गेल्या वर्षीचा विक्रम मोडू शकतात.

# जागतिक कीर्तीच्या कलाकार रजनी अंबादे यांच्या 'अमूर्त चित्र' ॲब्स्ट्रॅक्ट आर्ट प्रदर्शनीचे थाटात उद्घाटन

## छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात पहिल्यांदाच कला प्रदर्शनीचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**–जागतिक स्तरावर आपल्या अनोख्या कलेने स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या सुप्रसिद्ध चित्रकार अंबादासजी खोब्रागडे आर्ट फाउंडेशनच्या अध्यक्ष रजनी अंबादे यांच्या 'अमूर्त चित्र' या ॲब्स्ट्रॅक्ट आर्ट प्रदर्शनीचे भव्य आणि उत्साहपूर्ण वातावरणात उद्घाटन करण्यात आले.

डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख जयंती उत्सवाच्या निमित्ताने डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहातील गॅलरीमध्ये ही प्रदर्शनी सात दिवसाकरिता भरविण्यात आली आहे. सौ निर्मलाताई हर्षवर्धन देशमुख आणि सौ.प्रेरणाताई दिलीपराव इंगोले यांच्या प्रमुख उपस्थितीत या प्रदर्शनीचे उद्घाटन संपन्न झाले. यावेळी प्रसिद्ध चित्रकार विजय राऊत, आर्किटेक सतीश पिंपळे अकोला, प्रभजीत सिंह बछेर मानद सचिवइंडियन रेड क्रॉस सोसाइटी अकोला, उमेद पंख विश्वासाचे निशुल्क जयपूर फूट वितरणाचे मानद सचिव संदीप पुंडकर, आर्किटेक्ट रामेश्वर मनियार पुणे आकाश अंबादे, अधिष्ठाता डॉ.ए.टी देशमुख, यांची प्रमुख उपस्थिती होती.या प्रदर्शनीत रजनी अंबादे यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण ॲब्स्ट्रॅक्ट शैलीतून मानवी भावना, जीवनातील संघर्ष, आशा, ऊर्जा आणि अंतर्मनातील भावविश्व प्रभावीपणे मांडले आहे. रंगसंगती, रेषांचा मुक्त वापर आणि कल्पकता यामुळे प्रत्येक चित्र प्रेक्षकांशी थेट संवाद साधताना दिसून येते. असे विचार विजय राऊत यांनी व्यक्त केले.



श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारी परिषदेने विशेष पुढाकारातून आयोजित केलेल्या या प्रदर्शनीतील प्रत्येक कलाकृती प्रेक्षकांना अंतर्मुख करणारी आहे . अकोल्याचे कलावंत सतीश पिंपळे यांनी पोट्रेट प्रकारचे लाईव्ह डेमो देताना कमालीचे पोट्रेट तयार केले .पांढरी टोपी,दाढी,व शर्ट असताना पोट्रेट मध्ये अनेक प्रकारचा रंग वापरून चित्र तयार केले आणि उपस्थितांना बारकावे समजावून सांगितले. उद्घाटनप्रसंगी मान्यवर, कलाक्षेत्रातील तज्ज्ञ, कलाकार, तसेच अनेक रसिक प्रेक्षक उपस्थित होते. सर्वांनीच रजनी अंबादे यांच्या कलेचे मनापासून कौतुक करत या प्रदर्शनीला उत्कृष्ट प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ .ए.टी देशमुख, संचालन किशोर इंगळे, व आभार प्रदर्शन डॉ मोहोड यांनी केले. यावेळी अंबादे परिवारातील सदस्य तसेच शिव परिवारातील नागरिक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही प्रदर्शनी कला रसिकांसाठी एक वेगळा आणि समृद्ध अनुभव ठरत आहे .ही कला प्रदर्शनी सात दिवसासाठी अमरावतीकरा करिता उपलब्ध असून पहिल्यांदाच श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. या प्रदर्शनीचा आस्वाद घ्यावा असे आयोजकाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# कोलकास येथे कोरकूंच्या जीवनावर आधारीत केंद्र उभारणार : जिल्हाधिकारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**
चिखलदरा येथेच साहसी खेळाची अकॅडमी उभारण्यात येणार आहे. यासाठी जागा निश्चित करण्यात आली आहे. तसेच कोलकास येथे कोरकू यांच्या जीवनावर आधारीत केंद्र उभारण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशीष येरेकर यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयात पायाभूत सुविधा आणि चिखलदरा पर्यटनाबाबत आढावा घेण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.चिखलदरा येथे सिडकोमार्फत स्कायवॉक उभारण्यात येत आहे. स्कायवॉक उभारणीत अडचणी आल्याने काम पूर्ण करण्यासाठी स्कायवॉकच्या मध्यभागी



जमिनीतून आधार देणे आवश्यक आहे. यासाठी तात्पुरता पाया उभारण्यात येणार आहे. गोल रस्त्याचे काम करण्यात येणार असून यात वन विभागाच्या जागेवर तोडगा काढण्यात येणार आहे. याठिकाणी निसर्ग पर्यटनासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. यासाठी सादरीकरण करण्यात आले. चिखलदरा येथे येणारा पर्यटक याठिकाणी थांबावा, यासाठी लाईट इफेक्ट गार्डनची सूचना करण्यात आली. मात्र याठिकाणी वन्य प्राण्यांचा वावर असल्याने ही बाब तपासण्याच्या सूचना देण्यात आल्या. गाविलगड किल्ल्याचा विकास पुरातत्त्व विभागाच्या सल्ल्यानुसार करावा. आमझरी हे मधाचे गाव म्हणून विकसित करण्यात येत आहे. त्यामुळे येथे प्रशिक्षण आणि इतर सुविधा उभारण्यात याव्यात. यासोबतच मेळघाटातील २२ गावांमध्ये वीज पोहोचण्यासाठी वनविभागाच्या सर्व परवानगी घ्यावी. पीएम मित्रा पार्कमध्ये विज उपकेंद्रासाठी जागा मिळणार आहे. त्यानुसार नियोजन करण्यात येणार आहे. मोर्शी आणि वरूड भागासाठी संत्रा प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यात यावी. याठिकाणी कार्यरत जैन आणि एमकेसी यांच्यासोबत समन्वय राखण्यात येणार आहे, असेही जिल्हाधिकारी म्हणाले.

# अमरावती महानगरपालिका क्षेत्रात निवडणूकीसाठी 'एक खिडकी कक्षा'ची स्थापना

## सार्वत्रिक निवडणूका २०२५ साठी परवानग्या आता एका ठिकाणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती** सार्वत्रिक निवडणूका २०२५ च्या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील मतदान व निवडणूक प्रक्रिया अधिक सुरळीत, पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावी, यासाठी अमरावती महानगरपालिकेच्या वतीने 'एक खिडकी कक्षा'ची स्थापना करण्यात आली आहे. या कक्षामुळे उमेदवार, राजकीय पक्ष तसेच संबंधित यंत्रणांना निवडणूकीसंदर्भातील विविध परवानग्या मिळवणे अधिक सोपे व वेळेची बचत करणारे ठरणार आहे.सदर एक खिडकी कक्षाचे नियंत्रण अधिकारी म्हणून श्री. सागर रा. वानखडे, सहायक संचालक नगररचना यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक अधिकारी व कर्मचारी वर्ग कार्यरत असून, निवडणूक काळात येणाऱ्या विविध अर्ज व परवानग्यांवर तात्काळ व नियमबद्ध कार्यवाही केली जाणार आहे.या एक खिडकी कक्षामार्फत उमेदवारांना प्रचारासाठी आवश्यक असलेल्या विविध प्रकारच्या परवानग्या देण्यात येणार आहेत. प्रचार सभा, चौक सभा, बैठक सर्व प्रकारच्या जाहीर सभांसाठी परवानगी, प्रचारासाठी पोस्टर व झेंडे सभा स्थळावर तसेच इतर ठिकाणी लावण्याची परवानगी, खाजगी जागेवर जाहिरात फलक उभारण्यासाठी परवानगी यांचा समावेश आहे. तसेच उमेदवाराच्या



कार्यक्षेत्रापुरत प्रचार वाहन वापरण्याची परवानगी, प्रचार कार्यालय सुरू करण्याची परवानगीही या कक्षामार्फत देण्यात येणार आहे.याशिवाय, हेलिपॅडवर हेलिकॉप्टर उतरवण्यासाठी परवानगी, ध्वनिक्षेपक वापरण्याची परवानगी, मिरवणूक, रोडशो व रॅली काढण्यासाठी परवानगी, केबल जाहिरात तसेच व्हिडिओ व ऑडिओ क्लिप्सच्या प्रसिद्धीसाठी परवानगी देण्याचे कामकाजही या एक खिडकी कक्षामार्फत केले जाणार आहे. निवडणूक प्रक्रियेशी संबंधित इतर सर्व तदनुषंगिक कामकाजही या कक्षातून पार पडणार आहे.एक खिडकी कक्ष अमरावती महानगरपालिका, राजकमल चौक येथील मुख्य इमारतीमध्ये सहाय्यक संचालक नगररचना कार्यालय, दुसरा माळा येथील इंजिनियर्स केबिनमध्ये स्थापन करण्यात आला आहे. निवडणूक काळात उमेदवार व संबंधितांना एकाच ठिकाणी सर्व परवानग्या मिळाव्यात, प्रशासनावरचा ताण कमी व्हावा तसेच निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक राहावी, या उद्देशाने ही व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती सहाय्यक संचालक नगररचना, अमरावती महानगरपालिका यांनी दिली आहे.–

# आंतरराष्ट्रीय एआय परिषदेचे उद्घाटन

## डिजिटल हेल्थ आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या भविष्यावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती–**
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथे 'सामाजिक विकासासाठी एआय नवकल्पना' (खउ-खखडऊ-२०२५) या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन आज संपन्न झाले. प्राचार्य डॉ. आशिष महल्ले यांनी बुद्धिमत्तेच्या (-ख) माध्यमातून संशोधन आणि समाजोपयोगी तंत्रज्ञान यांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणे हाच या परिषदेचा मुख्य उद्देश आहे. या परिषदेमुळे शैक्षणिक क्षेत्र आणि उद्योग जगतातील दुवा अधिक दृढ होऊन विद्यार्थ्यांना जागतिक संशोधनाची दिशा समजण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला. उद्घाटनप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते 'बुक ऑफ बस्ट्रॅक्ट'चे प्रकाशन करण्यात आले.समीर सावरकर यांनी आरोग्य क्षेत्रात एआयच्या भूमिकेबाबत सांगितले की, ग्रामीण भागातील आरोग्यसेवा सक्षम करण्यासाठी एआय आधारित स्क्रीनिंग तंत्रज्ञान क्रांतिकारी ठरू शकते. तसेच, एसीएम नागपूर चॅप्टरचे अध्यक्ष रविंद्र केसकर यांनी संशोधनातील डेटा विश्लेषणाचे महत्त्व विशद केले. तर डॉ. निरंजन जोशी यांनी अभियंत्यांनी तांत्रिक ज्ञानासोबत सामाजिक जबाबदारीचे भान ठेवण्याचे आवाहन केले. परिषदेतील मुख्य आकर्षण ठरलेल्या विशेष सत्रात आयआयएससी बंगळुरूचे प्रा. डॉ. फणिंद्र कुमार यलवर्थी यांनी 'डिजिटल हेल्थ'वर मार्गदर्शन केले. त्यांनी आरोग्य क्षेत्रातील एज कम्प्युटिंग, थ्री-डी संकल्पना आणि एआय समोरील आव्हाने याविषयी माहिती दिली. आयोजन समितीचे समन्वयक डॉ. शंतनु लोही यांनी आभार मानले.

### राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमाअंतर्गत

# अमरावतीतील १०० खाजगी रुग्णालयांना युविन पोर्टल प्रशिक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती** माननीय आयुक्त यांच्या सूचनेनुसार राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमांतर्गत गरोदर माता व नवजात बालकांची नोंद प्रत्यक्ष रियल टाईम रिपोर्टिंग स्वरूपात युविन पोर्टलवर करण्यावर भर देण्यात येत आहे. या अनुषंगाने अमरावती महानगरपालिका क्षेत्रात नोंद असलेल्या आणि जिथे प्रसूती होतात अशा १०० खाजगी रुग्णालयांसाठी युविन पोर्टलचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.या प्रशिक्षणामध्ये युविन पोर्टल म्हणजे काय, त्यावर गरोदर माता व बालकांची नोंद कशी करावी, तसेच राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमात या पोर्टलचा कसा उपयोग होतो याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. लसीकरण



कार्यक्रमांतर्गत एकही माता अथवा बालक नोंदीविना राहू नये व त्यांना वेळेत लस मिळावी, यासाठी युविन पोर्टलवर नोंद होणे अत्यावश्यक असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.अमरावती महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी खाजगी रुग्णालयांना आवाहन केले की, सेवेसाठी येणाऱ्या सर्व गरोदर माता व जन्म झालेल्या बालकांची पोर्टलवर नोंद करावी, तसेच दिलेल्या जन्मतत्काळ लसीकरणाची माहितीही नोंदवावी, जेणेकरून एकही माता अथवा बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही.हे प्रशिक्षण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सभागृह, अमरावती महानगरपालिका येथे पार पडले. यावेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, माता व बाल संगोपन अधिकारी स्वाती कोवे, यूएनडीपीच्या प्रोजेक्ट ऑफिसर अश्विनी नागर, युविन समन्वयक अमोल बोरकर, दायला तसेच महानगरपालिकेचे आरोग्य कर्मचारी व खाजगी रुग्णालयांतील डॉक्टर व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्पर्धा परिक्षेची तयारी करताना अभ्यासक्रमावर लक्ष केंद्रीत करावे-सहायक जिल्हाधिकारी आकाश वर्मा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती–** केंद्रीय आणि राज्य शासनात सेवेमध्ये रूजू होण्यासाठी स्पर्धा परिक्षा हा मार्ग आहे. यात प्राथमिक चाचणी, मुख्य परिक्षा आणि मुलाखत अशा टप्प्यातून निवड केली जाते. या परिक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी अभ्यासक्रमावर लक्ष केंद्रीत करावे, असा सल्ला वाशिम येथील सहायक जिल्हाधिकारी आकाश वर्मा यांनी दिला. जिल्हा नियोजनच्या सभागृहात आज स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सहायक जिल्हाधिकारी आकाश वर्मा आणि उपजिल्हाधिकारी सुनिल टाकळे यांचे मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. यावेळी सहायक जिल्हाधिकारी कौशल्या एस., सहायक आयुक्त विकास खंदारे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. सुरज मडावी, ग्रंथालय सहायक संचालक राजेश पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे आदी उपस्थित होते. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या २०२४च्या परिक्षेत २०वा क्रमांक पटकाविलेले आकाश वर्मा यांनी यावेळी मार्गदर्शन केले. श्री. वर्मा यांनी, परिक्षा देण्यामागील उद्देश काय आहे, याचा विचार करून ही परिक्षा द्यावी. परिक्षा देण्याची संधी ही प्रत्येकाला असल्याने शासनात काम करण्याची संधी प्राप्त होते. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परिक्षांमुळे देशपातळीवर तसेच देशाबाहेरही सेवेची संधी प्राप्त होते. या परिक्षांची तयारी करीत असताना प्रामुख्याने अभ्यासक्रमावर लक्ष्य केंद्रीत करणे आवश्यक आहे. परिक्षांमध्ये काही प्रश्न हे अत्यंत कठिण असतात. त्यावेळी दिलेल्या पर्यायापैकी कोणते उत्तर योग्य राहिल, याची पडताळणी केल्यास




मार्क वाढविण्यास मदत होईल. प्रामुख्याने राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल, चालू घडामोडी या विषयांचा प्रामुख्याने अभ्यास करावा.परिक्षांमध्ये वेळेचा सदुपयोग आणि यश मिळविण्यासाठी चाचणी परिक्षा देणे आवश्यक आहे. यामुळे परिक्षेचा सराव होण्यास मदत मिळते. निबंध लिहिताना दिलेल्या विषयाला न्याय देणे गरजेचे आहे. यासाठी भारतीय संविधान, चालू घडामोडी आणि इतर साहित्याचा उपयोग होऊ शकतो. तसेच मुलाखतीला समोर जाताना समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय देण्याची तयारी केलेली असणे आवश्यक आहे. स्पर्धा परिक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी सातत्य आणि संयम असणे आवश्यक असल्याचे श्री. वर्मा यांनी सांगितले. श्री. टाकळे यांनी, स्पर्धा परिक्षा देण्यामागील उद्देश स्वच्छ असणे आवश्यक आहे. परिक्षेची तयारी करताना परिक्षांचा आकृतीबंध समजावून घेणे आवश्यक आहे. अभ्यासक्रम आणि आयोगाची गेल्या वर्षातील प्रश्नपत्रिका उपलब्ध आहेत. याचा सखोल अभ्यास करून या परिक्षांची तयारी करावी. प्राथमिक परिक्षा आणि मुख्य परिक्षांमध्ये कमी कालावधी असतो. त्यामुळे चाळणी परिक्षांची तयारी करताना मुख्य परिक्षेचा अभ्यास केल्यास लाभ मिळतो. त्यासोबतच केलेल्या अभ्यासातून स्वत:ची नोट काढल्यास त्याचा निश्चित फायदा मिळण्यास मदत होते. अभ्यास करताना स्वयंशिस्त महत्वाची असून यात अभ्यास आणि सराव महत्वाचा आहे. पूर्वीच्या परिक्षांचे प्रश्नपत्रिकांचा सराव केल्यास वेळेचा उपयोग आणि परिक्षांसाठी मानसिक तयारी होणे शक्य असल्याचे सांगितले. विकास खंदारे यांनी स्पर्धा परिक्षांची कार्यशाळा आयोजनामागील उद्देश सांगितला. स्पर्धा परिक्षांमध्ये यशस्वी झालेल्यांकडून स्थानिक विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाचा लाभ देण्यासाठी हा उपक्रम असल्याचे सांगितले.सारिका काळे यांनी सूत्रसंचालन केले. राजेश पाटील यांनी आभार मानले.

# चिखलदऱ्यात रेकॉर्ड ब्रेक थंडी !

## तापमान ५ अंशांवर; आठवडाभर थंडी राहणार कायम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०चिखलदरा**
चिखलदरा :विदर्भाचे नंदनवन चिखलदरा पर्यटनस्थळावरील पारा घसरलेला आहे. शुक्रवारी पहाटे ३ ते ५ दरम्यान ५ अंश सेल्सिअसची नोंद घेण्यात आली. यावर्षी सर्वात कमी ३ अंश सेल्सिअसपर्यंत पारा घसरला होता. तेव्हापासून कायम एक अंकी आकड्यावर विदर्भाच्या नंदनवनाचे तापमान स्थिरावले आहे. परिणामी परिसर



गारठला आहे. स्थानिक तसेच पर्यटक उबदार कपड्यांसह शेकोटी पेटवून बचाव करीत आहेत.

आठवडाभर सर्वत्र थंडीची लाट जाणवणार असल्याचे हवामान खात्याने पूर्वीच जाहीर केले आहे. चिखलदरा येथे मागील महिन्याभरापासून तापमानात कमालीची घट आली आहे. कुडकुडत्या थंडीमुळे स्थानिक रहिवासी धास्तावले आहेत. सकाळच्या कोवळ्या व दुपारच्या उन्हातही गार वारे असल्याने अंगात उबदार कपडे सतत घालून राहावे लागत असल्याचे चित्र आहे.नाताळ सुटी ते थर्टी फर्स्ट दरम्यान मोठ्या संख्येने पर्यटक चिखलदरा पर्यटनला येतात. त्यावेळी उबदार कपडे आणून पर्यटकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### सेमाडोह, कोलकास सुद्धा गारठले

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या सेमाडोह, कोलकास व मध्य प्रदेशच्या कुकरू, खामला व्हॅलीमध्येसुद्धा तापमान घसरले आहे. या परिसरातसुद्धा मोठ्या संख्येने पर्यटक जातात. आता ख्रिसमस व इअर एन्डिंगला त्यात भर पडणार आहे. विदर्भातील एकमेव थंड हवेचे ठिकाण असलेल्या चिखलदऱ्यासह आसपासच्या पर्यटनस्थळांवर देखील तिच परिस्थिती आहे. तेथील तापमानदेखील सरासरी १० अंश सेल्सिअसच्या खाली असल्याचे समोर आले आहे.

### चिखलदऱ्यात तापमानाची एक आकडी नोंद

चिखलदरा पर्यटनस्थळावरील सिपना महाविद्यालयात लावण्यात आलेल्या तापमान केंद्रावर शुक्रवारी पहाटे ३ ते ५ च्या सुमारास ५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असल्याचे प्रा. विजय मंगळे यांनी सांगितले. मागील २० दिवसांमध्ये सर्वात कमी ३ अंश सेल्सिअसची नोंद ते ९ अंश सेल्सिअसपर्यंत एकेरी आकड्यांमध्ये मध्यरात्री पहाटेचे तापमान नोंदविले जात आहे.

# डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचे आठ विद्यार्थी विद्यापीठ गुणवत्ता यादीत

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२०अमरावती**
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ द्वारा घेण्यात आलेल्या उन्हाळी २०२५ परीक्षेमध्ये डॉ.पंजाबराव देशमुख विधि महाविद्यालयाचे आठ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले असून दोन विद्यार्थ्यांनी संपूर्ण विद्यापीठ यादीतून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय हे गुणवत्तेची खाण म्हणून ओळखले जाणारे विद्यापीठ क्षेत्रातील एकमेव विधी महाविद्यालय आहे. यावर्षी देखील विद्यार्थ्यांनी गुणवत्तेची परंपरा कायम राखत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत आपला दबदबा कायम ठेवला आहे. एल.एल.एम या दोन वर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उन्हाळी परीक्षेत डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाची कुमारी विशाखा शेखर बिडवाई हिने संपूर्ण गुणवत्ता यादीत प्रथम स्थान पटकावले आहे.तर विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत याच महाविद्यालयाची एलएलबी पाच वर्षीय अभ्यासक्रमाची विद्यार्थिनी कुमारी साक्षी भरत कुपारेल हिने देखील प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. यासोबतच पाच वर्षीय अभ्यासक्रमाच्या कृणाली वासुदेव चालक




हिने पाचवा क्रमांक, ऋषिकेश श्याम काळकर याने गुणवत्ता यादीत आठवा क्रमांक तसेच आदित्य राघवेंद्र उपाध्याय याने विद्यापीठाचा गुणवत्ता यादीत दहावा क्रमांक प्राप्त केला आहे.एल.एल.बी तीन वर्षीय अभ्यासक्रमांमधून वैजयंतीराजे विश्वास काळे हिने गुणवत्ता यादीत तृतीय क्रमांक, शिल्पा राजू गुल्हाने हिने सातवा क्रमांक आणि योगेश रामकृष्ण सोळंके यांनी दहावा क्रमांक प्राप्त करत विद्यापीठ गुणवत्ता यादीत आपले स्थान प्राप्त केले.गुणवंत विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ वर्षा देशमुख, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# उद्यापासून सुरू होणार सलग दीड महिना चालणारी बहिरम यात्रा

## बहिरम बुवांच्या मूर्तीला शेंदूर, दूध, दही, मध व लोण्याचा होणार अभिषेक : विदर्भातील सर्वाधिक दिवस चालणारी जत्रा म्हणून प्रसिद्ध : इतर राज्यातूनही होते भक्तांची गर्दी





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० शिरजगाव कसबा**

श्री क्षेत्र बहिरम येथे श्री बहिरम बुवांची विधीवत होमपूजा व अर्चना करुन रविवारपासून (दि. २१) यात्रेला सुरूवात होत आहे. रविवारी पहाटे सर्वप्रथम बहिरम बुवांच्या मूर्तीला शेंदूर, दूध, दही, मध व लोण्याचा अभिषेक करण्यात येतो. त्यानंतर विधीवत पूजेनंतर मंदिरासमोरील यज्ञात पूर्णाहुती देऊन आरती केली जाते. त्यानंतर रोडग्याचा नैवद्य बहिरम बुवांना अर्पण केला जातो. त्यानंतर संस्थान अध्यक्षांव्दारे शंखनाद करून तसेच नारळ फोडून श्री बहिरम बुवा यात्रेचा उत्सव सुरु होतो. बहिरम संस्थानच्यावतीने विधिवत पूजा करून मंदिर परिसरातील सर्व देवालय बहिरमबुवा मूर्ती, शिव मंदिर, हनुमान मंदिर, महागणपती मंदिर या ठिकाणी अभिषेक पूजन संस्थानचे अध्यक्ष सुरेंद्र चौधरी व सर्व विश्वस्त मंडळी या धार्मिक सोहळ्याला सहकुटुंब उपस्थित असतात.

> दर्शनाकरिता येणाऱ्या भाविकांनी सुरक्षित व शांततेत दर्शन घ्यावे. मंदिर व्यवस्थापन समितीने दर्शविलेल्या सूचनांचे पालन करुन भाविकांनी सहकार्य करावे. –
>
> **सुरेंद्र चौधरी, अध्यक्ष, बहिरम बाबा संस्थान.**

दरवर्षी या यात्रेला मध्यप्रदेश, महाराष्ट्र राज्यातून हजारो भाविक बहिरम बुवांच्या दर्शनासाठी येतात. विदर्भातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात बहिरम यात्रा प्रसिध्द आहे. सलग दीड महिना चालणाऱ्या या यात्रेत बहिरमबुवांच्या दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळतात. महिला व पुरुष भाविकांकरिता बहिरम बुवांच्या दर्शन रांगेची वेगवेगळी व्यवस्था या ठिकाणी करण्यात आली आहे. तसेच यात्रेदरम्यान अनुचित प्रकार घडू नये, यात्रेचा उत्सव शांततापूर्ण व्हावा यासाठी जिल्हा ग्रामीण पोलिस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनात शिरजगाव कसबा पोलीस ठाण्याचे अधिकारी व पोलिस कर्मचाऱ्यांचे सहकार्य महत्त्वपूर्ण असते. सध्या व्यापारी वर्गाकडून व्यापारी प्रतिष्ठान सुरु करण्याचे काम सुरू असून येणाऱ्या पौष महिन्यातील पहिल्याच रविवारी यात्रा परिसरात भाविकांची मांदियाळी पाहायला मिळणार आहे. हंडीतील भाजी, रोडगे सुप्रसिद्ध व्यंजन बहिरम यात्रेत जाणारे बहुतांश भाविक दर्शन घेतल्यानंतर यात्रेतील हंडीत शिजणारी भाजी व रोडगे यांचा आवर्जून आस्वाद घेतात. हंडीतील भाजी व रोडगे हे बहिरम यात्रेतील सुप्रसिद्ध व्यंजन आहे. यात्रेदरम्यान या ठिकाणी अनेक भाविकांकडून विशेषत: रविवारी भोजन प्रसादाचे आयोजन यावेळी केले जाते.

# मध्यरात्री चंद्र आगमनावर फुटणारी दहीहंडी

## श्री समर्थ रामगीर महाराज पुण्यतिथी महोत्सव उत्साहात : गादी परंपरेला ४७० वर्ष झाली पूर्ण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अंजनगाव बारी**

परिसरातील निवडक देवस्थानापैकी विदर्भात प्रसिद्ध असलेले श्री समर्थ रामगीर महाराज समाधी मंदीराचा २३६ वा पुण्यतिथी महोत्सव पार पडला. ६ ते १३ डिसेंबर पर्यंत याठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमाचे घेण्यात आले. संत रामगीरी महाराज गादी परंपरेला आज ४७० वर्ष पूर्ण झाली असून आठवे मठाधिपती म्हणून शंकरगीरी गुरु प्रसन्नगीर महाराज देवस्थानाचे वारस आहे.

दरवर्षी दत्तजयंतीनंतर तिसऱ्यादिवशी येणाऱ्या या रामगीरी महाराज पुण्यतिथी महोत्सवात दुरवर गावातील भाविक आपली हजेरी लावतात. सप्ताहाभर हरिपाठ, किर्तन, काकडा आरती, पोवाडे, भजन, गवळनींच्या नादात संपूर्ण सप्ताह रंगण असतो. सप्ताहात श्रीमत् भागवत कथेचे आयोजन केल्या जाते. गेल्या काही वर्षांपासून या भागवत कथा वाचन, प्रवचनकार मुकुंद महाराज खाडे यांच्या अमृततुल्य वाणीतून होत आहे. भागवताची सांगता झाल्यानंतर शेवटच्या दिवशी काल्याचे किर्तन घनश्याम महाराज तायवाडे यांचे वाणीतून पार पडले. त्यानंतर भव्य महाप्रसादाचे वाटप भाविकांना करण्यात आले. या महोत्सवात गावागावातील भजन मंडळांनी समावेश होत आहे. लाखोंच्या संख्येने भाविकांनी या महोत्सवाचा लाभ घेतात.

यावेळी मठाधिपती शंकरगिरी महाराज यांनी सर्व कलावंतांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. यावेळी शंकर ठाकूर, गुणवंत शेलोकार, मनोज पुनसे, पत्रकार पवन इंगोले, बन्सी खडसे, प्रवीण बेरड, प्रमोद निचत, विनोद टिंगणे, टिळकराम हटवार, विनायक बावनकर, सुधाकर तलमले, जगजीवन येरणे, महादेव सौरपगारे, श्रीकृष्ण सैरीसे, दिलीप न्यायखोरे, प्रकाश खंडार, जगदीश अंबाडकर, प्रकाश साखरवाडे, भिकुजी पांडे, राजू गुलालकरी, किसनराव नागपुरे, प्रसाद किंदरले, अवधूत खडसे, श्रीराम निंबर्ते, भारत श्रीखंडे, मारोतराव भुरे, सुधाकर याऊल, तुकाराम अंबाडकर, मनोहर गोदे, मनोहर तेटू, वसंतराव सोनार, राजू ठाकूर, मनोहर भुजाडे, सुनील साखरवाडे, पुंडलिक न्यायखोरे, भीमराव न्यायखोरे, गजानन भगत, अंकुश दुधे, माणिक इंगोले, नारायण न्यायखोरे, श्रीकृष्ण चांबट, बाळासाहेब देशमुख, किसनराव गभणे, भास्कर गभणे, रमेश चकुले, दिलीप उऱ्हाडे, अभिजीत दुधे, चंदू खंडार यांचेसह स्थानिक शेकडो कलावंत महिला-पुरुष नागरिक व तरुण कार्यकर्त्यांनी कार्यक्रमास हजेरी लावली.

महाराष्ट्रातील एकुणच फुटणाऱ्या दहिहांडीमध्ये समर्थ रामगीर महाराज यांची दहीहंडी ही मध्यरात्री चंद्र आगमनावर फुटणारी पहिलीच दहीहंडी आहे. या दहीहंडीला हजारो भाविक आपली उपस्थिती लावतात. ही दहीहांडी पालखी रामगीरी महाराज समाधी मंदीरावरून थेट इंदीरा चौकात जाण्याकरिता निघते. यावेळी संपूर्ण रस्त्यांची रांगोळी व दिव्यांनी सजावट करून पालखीचे स्वागत केल्या जाते. वाजत- गाजत भजनांच्या नादात पालखी इंदीरा चौकात जाते. याठीकाणी मठाधिपती शंकरगीरी गुरु प्रसन्नागिरी महाराजांच्या शुभहस्ते दहीहंडी फोडव्यात आली, दहिहंडीचे किर्तन तुळशीराम महाराज सावरकर रा. काकड शिवणी यांच्या वाणीतून पार पडले. परिसरातील हजारो भाविकांनी दहीहंडी प्रसादाचा लाभ घेतला.

# जीवितहानीनंतरच रेल्वे प्रशासनाला जाग येणार का? नागरिकांचा सवाल

## भुयारी मार्गाची रस्त्याची दुरुस्ती होईपर्यंत रेल्वे गेट सुरू ठेवण्याची नागरिकांची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०मालखेड**

अमरावती-मालखेड मुख्य मार्गावरील मालखेड गावालगत रेल्वे भुयारी मार्गाखालील रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस अधिकच बिकट होत चालली आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, लोक प्रतिनिधींनी पाहणी करून सूचना देऊनही रेल्वे प्रशासनावर त्याचा काहीही परिणाम झालेला दिसत नाही.

यापूर्वी लोकप्रतिनिधींनी या रेल्वे अंडरब्रिजला भेटी देत प्रत्यक्ष पाहणी केली होती. रेल्वे प्रशासनाला आवश्यक त्या सूचना देखील दिल्या होत्या; मात्र तरीही प्रशासन कुणालाही जुमानत नसल्याचा अनुभव नागरिकांना येत आहे. पावसाळा संपूनही पुलाखालील रस्त्यावर साचलेले पाणी अद्याप तसेच आहे. सुमारे दोन फूट खोल खड्डा अक्षरशः जलाशयात रूपांतरित झाला आहे. हिवाळ्याच्या कडाक्याच्या थंडीतही या साचलेल्या पाण्यातूनच वाहनचालक व प्रवाशांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. तसेच रस्त्याच्या आतील लोखंडी सळाख्या मोठ्या प्रमाणात उघड्यावर आल्याने दुचाकी व चारचाकी वाहनांच्या चाकात त्या अडकून गंभीर अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. मात्र, या गंभीर समस्येकडे रेल्वे प्रशासन पूर्णतः दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. एखाद्याचा जीव गेल्यानंतरच रेल्वे प्रशासनाला जाग येईल का, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला जात आहे. दररोज शाळकरी विद्यार्थी, नोकरदार, प्रवासी व ग्रामस्थ याच रस्त्याचा वापर करतात. चिखल, दुर्गंधी व साचलेल्या पाण्यामुळे नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत. या आधीही येथे अपघात झाले. रेल्वे प्रशासनाने कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नाही, असा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

लोखंडी सळाख्या, खड्डे आणि चिखलाचा अडथळा रेल्वे भुयारी मार्गाखालील रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहे. त्यामध्ये कायमस्वरूपी पाणी साचले आहे. पाण्यामुळे खड्ड्यांचा अंदाज न येता वाहन चालकांना धाडसानेच मार्गक्रमण करावे लागत आहे. बाहेर आलेल्या लोखंडी सळाख्यांमुळे वाहनांचे टायर अडकण्याचा तसेच घसरून अपघात होण्याचा धोका वाढला आहे.

# ‘बीबीएनजी ’चा उद्या शुभारंभ


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर**

सर्वशाखीय व सर्वभाषीय ब्राह्मण व्यावसायिकांची देशातील सर्वातमोठी संस्था ’ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल ’च्या (बीबीएनजी) नागपूर चॅप्टरचा शुभारंभ कार्यक्रम रविवारी, २१ डिसेंबर रोजी विष्णू जी की रसोई, बजाजनगर चौक येथे सायंकाळी ४ वाजता होणार आहे. याप्रसंगी प्रभावी नेटवर्किंग आणि व्यवसाय कसा वाढवावा, या विषयावर वक्ते मार्गदर्शन करतील. याप्रसंगी डॉ. उदय बोधनकर, नरेंद्र जोग, अनंत कामठीकर, बीबीएनजीचे संस्थापक अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी, सुयोग नरवणे व डॉ. अभिजित चांदे उपस्थित राहतील.

BBN GLOBAL
समर्थ ब्राह्मण! संपन्न ब्राह्मण!! समृद्ध ब्राह्मण!!!

कार्यक्रमानंतर बीबीएनजीच्या फेब्रुवारी २०२६ मध्ये पुणे येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यावसायिक परिषदेचे सादरीकरण करण्यात येईल. यशस्वितेसाठी अपर्णा कंठे, श्यामल वैद्य, प्रबोध देशपांडे, नीरज चापोरकर, समीर देशकर, प्रशांत जोशी व प्रशांत कानिटकर मेहनत घेत आहेत. हा कार्यक्रम मोफत असून त्यास पूर्व नोंदणी आवश्यक आहे.

# उद्याचा दिवस राहणार वर्षातील सर्वात लहान दिवस : १० तास ४७ मिनिटे




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**


२१ डिसेंबर रोजी सूर्य जास्तीत जास्त दक्षिणेकडे राहील. या बिंदूला विंटर सोल्स्टाईस असे म्हणतात. या बिंदूवर सूर्य असतांना दिवस हा वर्षातला सर्वात लहान दिवस व रात्र ही सर्वात मोठी असते. २१ डिसेंबरचा दिवस हा १० तास ४७ मिनिटांचा राहील. या दिवसात दरवर्षाला एक दिवसाचा फरक पडू शकतो.

दिवस व रात्रीचा कालावधी कमीजास्त होणे आपण नेहमीच अनुभवत असतो. पृथ्वीचा अक्ष २३.५ अंशाने कललेला असल्याने हे घडत असते. याचाच परिणाम म्हणून सूर्याचे उत्तरायण व दक्षिणायण सुद्धा आपल्याला अनुभवता येते. कोणत्याही वस्तूच्या पडणार्या सावलीचे निरीक्षण केल्यास सूर्याचे दक्षिणायण व उत्तरायण सहज लक्षात येऊ शकते. पृथ्वीवरील ऋतू सुध्दा पृथ्वीच्या अक्षाच्या कलत्या स्थितीमुळे निर्माण होतात. आकाशात वैषुविक आणि आयनिक वृत्ताचे दोन काल्पनिक छेदन बिंदू आहेत. यापैकी एका बिंदूत २२ मार्च रोजी सूर्य प्रवेश करतो याला ‘वसंत संपात बिंदू’ असे म्हणतात. तर त्याचे विरुद्ध बिंदूत २३ सप्टेंबर रोजी सूर्य प्रवेश करतो याला ‘शरद संपात बिंदू’ असे म्हणतात. या दोन्ही दिवशी रात्रीचा व दिवसाचा कालावधी हा सारखाच असतो. २१ डिसेंबर रोजी सूर्य जास्तीत जास्त दक्षिणेकडे असतो. या बिंदूवर सूर्य असतांना दिवस हा वर्षातला सर्वात लहान दिवस व रात्र ही सर्वात मोठी असते. या दिवसाला ‘हिवाळा अयन दिवस’ असे सुद्ध म्हणतात.

सर्व खगोल प्रेमींनी व जिज्ञासूंनी २१ डिसेंबर या सर्वात लहान दिवसाचे प्रत्यक्ष कालमापन करावे व या १० तास ४७ मिनिटांच्या सर्वात लहान दिवसाचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा, असे आवाहन मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व एस. आर.पी. कॅम्प, अमरावती स्थित हौशी खगोल अभ्यासक विजय म. गिरुळकर यांनी केले आहे.

# शिक्षकांना आता केंद्राच्या ‘ॲप’चा ताप

## झालेले काम पुन्हा करण्याची वेळ




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

राज्य सरकारच्या शिक्षण विभागाच्या आदेशानुसार राज्यातील शाळांचे ’जिओ टॅगिंग’ करण्यात आल्यानंतर आता केंद्र सरकारच्या ॲपसाठी पुन्हा ’जिओ टॅगिंग’ करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे राज्यातील शिक्षकांना आता केंद्र सरकारच्या ॲपचा ताप सहन करावा लागणार आहे.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक संजय यादव यांनी परिपत्रकाद्वारे विभागीय उपसंचालक, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिकांचे आयुक्त यांना शाळांच्या ’जिओ टॅगिंग’बाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार, शाळेच्या ठिकाणाची (अक्षांश रेखांश) अचूक माहिती मोबाइल ॲपद्वारे नोंदवण्यासाठी ’यूडायस प्लस जीआयएस कॅप्चर मोबाइल ॲप’ विकसित करून उपलब्ध करण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाने ते तयार केले आहे. या ॲपद्वारे संगणकीकृत केलेल्या माहितीचा उपयोग केंद्र, राज्य, जिल्हा, तालुका स्तरावर प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी, नियोजन, शैक्षणिक साधने, धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी, तसेच आलेखात्मक विश्लेषण करण्यासाठी होणार आहे. हे ॲप अँड्राइड आणि आयओएस प्रणाली असलेल्या मोबाईलवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. शाळेच्या मुख्याध्यापकांनी मोबाईलमध्ये ’यूडायस प्लस जीआयएस कॅप्चर मोबाइल ॲप’ घेऊन ’यूडायस’च्या लॉगिन आयडी आणि पासवर्डद्वारे मोबाइल ॲपमध्ये जाऊन शाळेच्या ठिकाणाची माहिती अचूक नोंदवावी.

जिल्ह्यातील सर्व शाळांना ’यूडायस प्लस जीआयएस कॅप्चर मोबाइल ॲप’द्वारे शाळेच्या ठिकाणाची माहिती मार्गदर्शक सूचनांनुसार तत्काळ नोंदवण्यासाठी कळवण्यात यावे,’ असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. काही महिन्यांपूर्वी राज्यातील शाळा आणि अंगणवाड्यांचे ’जिओ टॅगिंग’ करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेऊन शाळांना जिओ टॅगिंग करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार शिक्षक, मुख्याध्यापकांनी ’जिओ टॅगिंग’ची प्रक्रिया पूर्ण केली आहे. मात्र, आता केंद्र सरकारच्या ॲपसाठी मुख्याध्यापक, शिक्षकांना तेच काम पुन्हा करावे लागणार असल्याचे चित्र आहे.

’यूडायस’मध्ये प्रत्येक शाळेचे ठिकाण, भौतिक सुविधांविषयी माहिती आधीच अद्ययावत केली आहे. आता ’यूडायस प्लस जीआयएस कॅप्चर ॲप’च्या माध्यमातून पुन्हा शाळेचे ठिकाण, भौतिक सुविधांची माहिती देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यासाठीचे ॲप शिक्षकांना स्वतःच्या मोबाइलमध्ये घ्यावे लागणार आहे.

**शिक्षक हैराण झाले आहेत**

शिक्षण विभागाचे अनेक ॲप आधीच मोबाईलमध्ये असल्याने मोबाइल बंद पडण्याची स्थिती निर्माण झाली आहे. तीच तीच कामे किती वेळा करायची, किती वेळा शिक्षकांनी स्वतःचा मोबाईल शासनाच्या कामासाठी वापरायचा? सततचे ऑनलाइन दुवे, ॲपमुळे शिक्षक हैराण झाले आहेत. याचा कोणी विचार करणार आहे की नाही? अशी प्रतिक्रिया विजय कोंबे राज्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती यांनी दिली.

# चांदूर बाजारमध्ये मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज, ४ फेऱ्यांमध्ये पूर्ण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०चांदूर बाजार**

नगरपरिषद निवडणुकीच्या मतदानानंतर आता सर्वांचे लक्ष मतमोजणीकडे लागले असून प्रशासन पूर्णतः सज्ज झाले आहे. रविवार सकाळी (ता. २१) ठीक दहा वाजता मतमोजणीस सुरुवात होणार असून ही संपूर्ण प्रक्रिया नगरपरिषद टाऊन हॉल येथे पार पडणार आहे.मतमोजणीसाठी एकूण सहा टेबलांची व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये एकाटेबलवर केवळ पोस्टल बॅलेटची मोजणी होणार असून उर्वरित पाच टेबलांवर ईव्हीएमवरील मतमोजणी केली जाणार आहे. ही संपूर्ण मतमोजणी चार फेऱ्यांमध्ये पूर्ण होणार असून प्रत्येक फेरीत उमेदवारांचे भवितव्य हळूहळू उलगडत जाणार आहे. या मतमोजणीसाठी एकूण ४९ अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. नगरसेवक व नगराध्यक्ष पदासाठीची मतमोजणी जरी एकाचवेळी सुरू असली, तरी निकाल जाहीर करताना क्रम पाळला जाणार आहे.



सर्वप्रथम नगरसेवक पदांचे निकाल जाहीर करण्यात येणार असून त्यानंतर सर्वांच्या उत्कंठेला कळस चढवणारा नगराध्यक्ष पदाचा अंतिम निकाल घोषित केला जाणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेचे मार्गदर्शन निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सोनल सूर्यवंशी करत असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निवडणूक अधिकारी व मुख्याधिकारी गीता ठाकरे, मनोज सोनारकर तसेच नगरपरिषद कार्यालय अधीक्षक प्रफुल गाडबैल हे जबाबदारी पार पाडत आहेत. प्रशासनाच्या समन्वयामुळे मतमोजणी प्रक्रिया सुरळीत व वेळेत पूर्ण होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. मतमोजणी शांततेत पार पडावी यासाठी पोलीस प्रशासनानेही कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे. ठाणेदार अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तब्बल ४५ होमगार्ड, ११० पोलीस कर्मचारी तसेच एसआरपीचे पथक तैनात करण्यात आले आहे. टाऊन हॉल परिसरात चौक बंदोबस्त ठेवण्यात आला असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सतर्कता बाळगण्यात येत आहे. नगरपरिषद निवडणुकीची मतमोजणी आहे. चांदूर बाजार चा रविवारला भरणार आठवडी बाजार सुद्धा बंद ठेवण्यात आला आहे.

# अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेसाठी शांततेत मतदान

## सकाळी एका केंद्रावर ईव्हीएम बिघाडामुळे काही काळ खोळंबा; दुपारी साडेतीन पर्यंत ५५.४५ टक्के मतदान











**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अंजनगांव सुर्जी**

अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी आज मतदान प्रक्रिया पार पडत आहे. नगराध्यक्ष पदासाठी ७ तर २८ नगरसेवक पदांसाठी १७३ उमेदवार रिंगणात असून सकाळी साडेसात वाजता मतदानाला सुरुवात झाली. शहरातील एकूण ५२ मतदान केंद्रांवर मतदानाची व्यवस्था करण्यात आली आहे.नगर परिषद शाळेच्या मतदान केंद्र क्रमांक ४/३ येथे ईव्हीएम मशीनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने काही काळ मतदान प्रक्रिया थांबली होती. त्यामुळे मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. मात्र बिघाड दूर केल्यानंतर पुन्हा मतदान सुरळीत सुरू झाले.निवडणुकीत काँग्रेसचे खासदार बळवंत वानखडे, ठाकरे गटाचे आमदार गजानन लवटे, शिवसेनेचे माजी आमदार अभिजीत अडसूळ यांची प्रतिष्ठा पणाला लागली असून आमदार गजानन लवटे यांचे पुत्र यश लवटे हेही निवडणुकीच्या रिंगणात आहेत.शांततापूर्ण मतदानासाठी संवेदनशील केंद्रांवर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून कायदा–सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासन सज्ज आहे.आज सकाळ पासूनच मतदारांमध्ये उत्सहाचे वातावरण होते दुपारी अनेक मतदान केंद्राबाहेर लांबचं लांब रांगा लागल्या होत्या. जिल्ह्यातील एकमेव प्रलंबित असलेली अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेसाठीआज शनिवारी (दि. २०) मतदान प्रक्रिया पडली . या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. या ठिकाणी नगराध्यक्ष पदासाठी ७ तर नगरसेवक पदासाठी तब्बल १७३ उमेदवार आपले राजकीय भविष्य आजमावत आहेत.अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेसाठी एकूण १४ प्रभाग असून प्रत्येक प्रभागातून २ याप्रमाणे एकूण २८ नगरसेवकांची निवड होणार आहे. या २८ जागांसाठी १७३ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले असून चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे. तसेच नगराध्यक्ष पदासाठी ७ उमेदवार रिंगणात असून नगराध्यक्षांची निवड थेट जनतेतून निवड होणार आहे.दुपारी साडेतीन वाजेपर्यन्त ५५.४५ टक्के मतदान झाले होते.

मतदानासाठी शहरात एकूण ५२ मतदान केंद्रे असून प्रत्येक मतदान केंद्रावर एक केंद्रप्रमुख, तीन मतदान कर्मचारी, एक महिला कर्मचारी तसेच एक पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आला आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पडावी, यासाठी प्रशासनाने विशेष दक्षता घेतलीली होती.

धारणी नगर पंचायतीमध्ये प्रभाग क्र. १४ आणि १६ मध्ये सुरु असलेल्या मतदानात दुपारी पर्यंत ५७ टक्के तर वरुड येथील एकुण प्रभागात दुपारपर्यंत ५१.७७ टक्के, दर्यापूरमध्ये ५३.७७ टक्के मतदान, अचलपुर मध्ये ४३.०८ टक्के तर मतदान झाले.

# जगण्यासाठी शेतकऱ्याची किडनी विक्री
# सरकार म्हणते योजनांसाठी निधी अपुरा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर**

राज्य सरकारकडे पुरेसा निधी उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या कृषी यांत्रिकीकरण, सिंचन, फलोत्पादन तसेच अन्य कृषीपूरक योजनांचा लाभ मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना मिळू शकलेला नाही. सन २०२१–२२ ते २०२४–२५ या चार आर्थिक वर्षांच्या कालावधीत राज्यभरातून तब्बल ५६.१७ लाख शेतकऱ्यांनी या योजनांसाठी अर्ज केले. मात्र त्यापैकी केवळ १८.४६ लाख शेतकऱ्यांनाच प्रत्यक्ष लाभ मिळाल्याचे सरकारच्या अधिकृत कागदपत्रांमधून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे सुमारे ३८ लाखांहून अधिक शेतकरी विविध योजनांच्या लाभापासून वंचित राहिले आहेत.

राज्यातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती उत्पादनक्षमता वाढविता यावी, या उद्देशाने कृषी यांत्रिकीकरण, सूक्ष्म सिंचन, फलोत्पादन, हरितगृह, शेडनेट, ठिबक सिंचन आदी योजनांसाठी महा–डीबीटी प्रणालीद्वारे अर्ज मागविण्यात आले होते. या योजनांना शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. मात्र अर्जांची संख्या प्रचंड वाढली असताना त्याच्या तुलनेत सरकारकडे उपलब्ध निधी अपुरा ठरला. परिणामी अनेक अर्जांची छाननीच होऊ शकली नाही आणि लाखो शेतकऱ्यांना प्रतीक्षेत राहावे लागले.

या गंभीर बाबीकडे लक्ष वेधण्यासाठी पैठणचे आमदार विलास भुमरे यांनी विधिमंडळात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना राज्य सरकारने निधीच्या मर्यादेची स्पष्ट कबुली दिली आहे. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, महा–डीबीटी पोर्टलवर प्राप्त झालेल्या सर्व अर्जांना १०० टक्के अर्थसहाय द्यायचे झाल्यास तब्बल ४४ हजार ६३७ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता भासणार आहे.

तसेच, मागील अनुभव लक्षात घेता अर्ज करणारे सर्व शेतकरी मंजूर झालेल्या बाबींचा प्रत्यक्ष लाभ घेतातच असे नाही, असेही सरकारने नमूद केले आहे. त्यामुळे सन २०२५–२६ या आर्थिक वर्षासाठी 'फर्स्ट कम फर्स्ट सर्व्ह' (एफसीएफएस) या तत्वावर ४६.७० लाख संभाव्य लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

सरकारच्या माहितीनुसार, सन २०२१–२२ ते २०२४–२५ या कालावधीत विविध योजनांअंतर्गत आर्थिक लक्ष्यांच्या मर्यादेत राहून १८.४६ लाख शेतकऱ्यांना एकूण ६५२१.४० कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे. उर्वरित प्रलंबित अर्जदारांच्या निकडीचा विचार करून टप्प्याटप्प्याने निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे सरकारने स्पष्ट केले आहे. मात्र शेतकऱ्यांनी मंजूर बाबींची कामे पूर्ण केल्यानंतरच अनुदान वितरित केले जाईल, असेही सरकारने सांगितले आहे.

# श्री संत गाडगे महाराज यांच्या ६९ व्या पुण्यतिथी निमित्त उद्याला भव्य शोभायात्रा





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

श्री संत गाडगे महाराज समाधी मंदिर गाडगेबाबा नगर अमरावती यांच्यावतीने श्री गाडगे बाबांच्या ६९ व्या पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन केले असल्याने त्या निमित्ताने २१ डिसेंबर ला सकाळी गाडगे बाबांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा सकाळी नऊ वाजता संस्थेचे विश्वस्त तथा गाडगे महाराज मिशन उपाध्यक्ष बापूसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली निघणार असून ही मिरवणूक गाडगेबाबा नगर येथून निघणार असून या मिरवणुकीमध्ये गाडगे महाराज आदिवासी आश्रम शाळा नागरवाडी ढोलाच्या दिंड्या भजनी मंडळ बँड पथक सहभागी होणार आहेत तिचा समारोप बारा वाजता गाडगे महाराज समाधी मंदिर गाडगेबाबा नगर अमरावती या ठिकाणी होणार असून त्यानंतर ह भ प संदीप महाराज गिरी यांचे काल्याचे किर्तन दुपारी बारा वाजता व त्यानंतर अडीच वाजता संत गाडगेबाबा सेवा पुरस्कार स्वर्गीय दादासाहेब देशमुख यांचे स्मृती पिक्चर्स देण्यात येणारा या वर्षीचा पुरस्कार श्री नितीन जी दळवी युवा समाजसेवक मुंबई यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे व त्यानंतर प्राध्यापक डॉक्टर अरविंदराव देशमुख यांचे संत गाडगेबाबांच्या जीवनावर प्रबोधन कार्यक्रम होणार व साडेतीन नंतर भावी भक्तांना महाप्रसाद देण्यात येणार आहे तरी वरील सर्व कार्यक्रम प्रसंगी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन संस्थेचे विश्वस्त सागर देशमुख व्यवस्थापक प्रकाश महात्मे, गजानन देशमुख दर्यापूर यांनी एका प्रसिद्धी पत्रका द्वारे केले आहे

## शेतकऱ्यांना त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याचे आदेश

# नाफेड सोयाबीन खरेदी केंद्राची तहसीलदारांकडून पाहणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०धामणगाव रेल्वे**

येथील शासनाच्या नाफेड सोयाबीन खरेदी केंद्रावर तहसीलदार अभय घोरपडे यांनी अचानक भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी सोयाबीन खरेदीतील संपूर्ण व्यवस्थेचा आढावा घेत शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश संबंधितांना दिले.धामणगाव रेल्वे येथे दत्तापूर (धा.) शेतकी खरेदी–विक्री संस्थेच्या माध्यमातून नाफेड अंतर्गत शासकीय सोयाबीन खरेदी सुरू आहे. मात्र खरेदी केंद्रावर १२ टक्के ओलाव्याची अट, दाण्यांची स्वच्छता, तुटफूट तसेच इतर कठोर निकष लावण्यात आल्याने अनेक शेतकऱ्याऱ्यांचे सोयाबीन मोठ्या प्रमाणावर रिजेक्ट होत असल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. या गंभीर प्रश्नाकडे आ. प्रताप अडसड यांनी विधिमंडळात लक्षवेधी मांडून शासनाचे लक्ष वेधले होते. शेतकऱ्यांना होणारा त्रास तसेच नाफेड खरेदी केंद्रावरील संभाव्य गैरप्रकारांच्या पार्श्वभूमीवर तहसीलदार अभय घोरपडे यांनी नाफेड खरेदी केंद्राला भेट देत प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली यावेळी तहसीलदार घोरपडे यांनी खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांकडून एफएक्यू दर्जाचा माल खरेदी करण्यात यावा, तसेच सोयाबीन खरेदी प्रक्रियेतशेतकऱ्याऱ्यांना कोणताही आर्थिक किंवा मानसिक त्रास होणार नाही, याची विशेष दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या. शासनाने ठरवून दिलेल्या निकषांनुसारच खरेदी करण्यात यावीः मात्र अनावश्यक अडचणी निर्माण होणार नाहीत, याची जबाबदारी प्रशासन व केंद्र चालकांनी घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान नाफेडच्या निकषांनुसार २०२५–२६ हंगामातीलच सोयाबीन खरेदी करण्यात येत असून चाळणी व हमाली व्यतिरिक्त कोणताही अतिरिक्त किंवा अनुषंगिक खर्च शेतकऱ्यांकडून घेतला जात नसल्याची माहिती देण्यात आली.बायोमेट्रिक रजिस्ट्रेशन पद्धतीमुळे शेतकऱ्यांना थेट फोन करून नोंदणीसाठी तसेच खरेदीसाठी क्रमांक लागल्यानंतर पुन्हा फोन करून बोलावण्यात येत असल्याचे सांगण्यात आलेः मात्र एफएक्यू दर्जाचा माल खरेदी करूनही वखार महामंडळाच्या गोदामावरून सोयाबीन परत पाठवले जात असल्याच्या तक्रारी असल्याची माहिती दत्तापूर (धा.) शेतकी खरेदी–विक्री संस्थेचे व्यवस्थापक मारोती बोकडे यांनी दिली.तहसीलदारांच्या पाहणीनंतर शेतकऱ्यांना दिलासा मिळेल आणि नाफेड सोयाबीन खरेदी प्रक्रियेत अधिक पारदर्शकता व सुलभता येईल, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

# तिवसा येथे पोलीस भरतीच्या स्वप्नांना बळ देणारी भव्य मुलींची फिजिकल कॉम्पिटिशन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०तिवसा**

आजच्या स्पर्धात्मक युगात पोलीस भरतीसाठी सज्ज होत असलेल्या तरुणींना योग्य व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने दिवंगत रामकृष्णजी खाकसे व दिवंगत अक्षय 'लकी' शापामोहन यांच्या स्मृतीप्रित्यर्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृती समिती व पंचशील व्यायाम प्रसारक मंडळ, तिवसा यांच्या वतीने तसेच बेस्ट पोलीस अॅकेडमी तिवसा यांच्या सहकार्याने भव्य मुलींची फिजिकल कॉम्पिटिशन दिनांक २० डिसेंबर रोजी जिनिंग प्रेसिंग तिवसा येथे उत्साहात पार पडली.या स्पर्धेत ८०० मीटर धावणे, १०० मीटर रनिंग व गोळाफेक या पोलीस भरतीसाठी अत्यंत महत्त्वाच्या चाचण्यांचा समावेश होता. एकूण ५० गुणांची ही स्पर्धा असून स्पर्धक मुलींनी शिस्त, चिकाटी व आत्मविश्वासाचे दर्शन घडवले. चुरशीच्या लढतीतसमीक्षा सावरकर हिने प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपद मिळवले, कांचन अमझरे हिने द्वितीयतर प्रिया तांबडे हिने तृतीय क्रमांक मिळवला.कार्यक्रमाचे अध्यक्ष संदीप चक्रनारायण सर होते. प्रमुख अतिथी म्हणून अरविंद वाघमारे सर, संदीप दहाट (आपदा मित्र) तसेच ललित सर (अमरावती) यांनी उपस्थिती दर्शवली. मान्यवरांनी आपल्या भाषणातून मुलींनी स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवून सातत्याने मेहनत केल्यास पोलीस दलात नक्कीच स्थान मिळू शकते, असा विश्वास व्यक्त केला. स्पर्धेदरम्यान वैयक्तिक बक्षिसांची मोठ्या प्रमाणावर लयलूट करण्यात आल्याने स्पर्धकांमध्ये अधिक उत्साह निर्माण झाला. या स्पर्धेसाठी तिवसा तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातील पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या मुलींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. या भव्य उपक्रमाच्या यशस्वी आयोजना–साठी अक्षय माहोरे, संदीप थोटे, गजानन रामटेके, अमोल खाकसे, प्रशिक मकेश्वर, अंकुश मेंढे, प्रशिक शापामोहन, संदीप गडलिंग, निखिल वानखडे, पंकज पांडे व विशाल शापामोहन यांनी विशेष परिश्रम घेतले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित शापामोहन सर यांनी प्रभावीपणे केले. प्रास्ताविक जगदीश माहोरे सर यांनी स्पर्धेचा उद्देश स्पष्ट केला, तर आभार प्रदर्शन विनोदचंद्र शापामोहन यांनी केले.

# अमरावती महानगरपालिकेची निवडणुक सरकार आणि निवडणुक विभागाने हायजॅक केल्याचा आरोप

## प्रभाग रचना कागदोपत्री आणि दुबार नावे जैसेथेच असल्याने संताप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

अमरावती महानगरपालिकेच्या मतदार यादी वरून सातत्याने काँग्रेस पक्ष आरोप करीत आहे, अमरावती महानगरपालिकेची प्रारूप मतदार यादी आणि अंतिम मतदार यादी ही एकच ठेवली आहे, एका प्रभागातील नावे दुसऱ्या प्रभागात गेल्यानंतरही कोणतीही सुधारणा झाली नाही, मतदारांच्या नावात त्रुटी असून नोंदवलेल्या आक्षेप हरकतीवर सुनावणी घेण्यात आली नाही, पुराव्यानिशी आक्षेप नोंदवण्यात आले मात्र तरी देखील दखल घेतल्या नसल्याचा आरोप काँग्रेसचे माजी नगरसेवक मुन्ना राठोड आणि युवक काँग्रेसचे समीर जवंजाळ यांनी केला, तसेच प्रभाग क्रमांक १८ मध्ये एकाच घरात २०० मतदार भाजप पदाधिकाऱ्याकडे आढळून आल्याने त्याची सुद्धा तक्रार करून दखल घेतल्या नसल्याचा आरोप केला, निवडणुकीतील मतदार यादीत मोठा गोंधळ असल्याचा आरोप करण्यात आला,त्यामुळे १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानाच्या दिवशी अमरावती महानगरपालिकेचे मतदान केंद्रावर मोठा गोंधळ उडण्याची शक्यता आहे, त्यामुळे उद्भवणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेला महापालिका प्रशासन आणि पोलीस प्रशासन जबाबदार असणार अशी प्रतिक्रिया युवक काँग्रेसने दिली

# प्रभाग क्रमांक ९ वडाळी–एसआरपीएफ : विकासाचा अजेंडा मांडत भाजपाच्या सौ. पौर्णिमा राहुल गवळी यांची उमेदवारीसाठी मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ९ वडाळी–एसआरपीएफ, महादेवखोरी व मंगलधाम परिसरातून भारतीय जनता पार्टीकडे सर्वसाधारण महिला गट (क) मधून उमेदवारीसाठी सौ. पौर्णिमा राहुल गवळी यांनी अधिकृत मागणी केली आहे. उमेदवारी अद्याप जाहीर झालेली नसली तरी, सर्वांगीण विकासाचा ठोस अजेंडा मांडत त्यांनी पक्षाकडे आपला दावा मजबूत केला आहे.प्रभागातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी विद्यापीठ डेंटल कॉलेज समोरील रस्त्याचे रुंदीकरण, तसेच वडाळी तलाव व गार्डन नागरिकांसाठी खुले करून त्यांचा विकास करण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी सांगितले. पर्यावरणपूरक उपक्रमांतर्गत बांबू उद्यान विकसित करण्यासाठी प्रशासनाकडे प्रस्ताव सादर करण्याचे प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी नमूद केले. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी बचत गटांच्या



माध्यमातून शासन स्तरावरून व महापालिकेकडून विविध योजना राबविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. त्याचप्रमाणे एसआरपीएफ वसाहतीतील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती, डांबरीकरण व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाकडे ठोस पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.स्वच्छता व आरोग्याच्या दृष्टीने प्रभागात नियमित स्वच्छता, कचरा व्यवस्थापन व आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यावर भर दिला जाईल. वडाळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक सुधारणा करून नागरिकांना अधिक दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, तसेच महादेवखोरी–मंगलधाम परिसरात नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्यासाठी प्रशासनाकडे मागणी केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

भाजप ओबीसी मोर्चा अमरावती शहर जिल्ह्याचे उपाध्यक्ष राहुल कैलासराव गवळी यांच्या पत्नी असलेल्या सौ. पौर्णिमा राहुल गवळी यांनी पक्ष नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत, पक्षाने संधी दिल्यास प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम करू, असा निर्धार व्यक्त केला आहे. त्यांच्या उमेदवारीच्या मागणीमुळे प्रभाग क्रमांक ९ मध्ये राजकीय हालचालींना वेग आला आहे.

# चिमुकल्यांनी रांगोळी व चित्रकलेच्या माध्यमातून दिला मतदान जनजागृतीचा संदेश




## स्वीप उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांचे चित्रकला व रांगोळी स्पर्धा संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती**

अमरावती महानगरपालिकेच्या वतीने माननीय आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौ सौम्या शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमांतर्गत मतदान जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्यापैकी नुकतेच मला हिंदी शाळा क्रमांक ११, भाजी बाजार , मनपा उच्च प्राथमिक शाळा क्रमांक १३ व मनपा उर्दू उच्च प्राथमिक शाळा क्रमांक ०६ चपराशी पुरा येथे विद्यार्थ्यांची रांगोळी स्पर्धा व चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांनी मतदान माझा अधिकार यावर आधारित विविध प्रकारच्या रांगोळ्या तसेच चित्रे काढून मतदान जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.

तसेच यावेळी स्वीप उपक्रमांतर्गत उपस्थित शिक्षक पालक व विद्यार्थ्यांना मतदानाची शपथ सुद्धा देण्यात आली.यावेळी स्वीप उपक्रमांतर्गत नियंत्रण अधिकारी तथा मनपा शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, शाळा निरीक्षक श्री योगेश पखाले, सदस्य पंकज सपकाळ ,कैलास कुलट ,संजय बेलसरे, निजामुद्दीन काजी, सुषमा दुधे, शुभांगी सुने,उज्वल जाधव,विशाल वालचाळे , सोमेश वानखडे , शाळेचे मुख्याध्यापक गोपाल कांबळे, चित्रा खोब्रागडे , सय्यद हमजा व शिक्षक हे प्रामुख्याने उपस्थित होते.




आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत